# बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ५३ | बुधवार,दि.०७ डिसेंबर २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# रेल्वेच्या मेगाब्लाकच्या प्रतिक्षेत जुना जिर्ण पूल



**गोंदिया :** गोंदिया-बालाघाट मार्गावरील जुना उड्डाणपूल जीर्ण झाला असून तो केव्हाही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या पुलावरील जडवाहतूक पूर्णपणे बंद करण्याचे पत्र रेल्वे विभागाने जिल्हाधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला जून २०१८ मध्ये दिले होते. त्यानंतर जुन्या जीर्ण उड्डाणपुलावरील जड वाहतूक पूर्णपणे बंद करुन केवळ दुचाकी आणि तिनचाकी वाहनांना या पुलावरुन प्रवेश सुरू ठेवले होते.त्यानंतर २ मे २०२२ पासून या पुलावरुन वाहतुक पुर्णतः बंद करुन पूल पाडण्यास सुरवात झाली.गेल्या सहा महिन्यापासून या पूलाला पाडण्याचे काम सुरु आहे.मात्र यापैकी ३ महिने हे रेल्वेच्या रुळावरील भाग तोडण्यासाठी कंत्राटदाराला वाट बघावी लागत आहे.रेल्वेने अजूनही मेगा ब्लॉंक मंजूर न केल्याने रेल्वेला आता हा पूल धोकादायक वाटत नाही का अशा प्रश्न बल्लारपूरच्या घटनेवरुन नागरीक विचारु लागले आहेत.

या उड्डाणपुलाच्या खालून रेल्वेचा ट्रक गेला असून तेवढाच भाग जास्त जीर्ण झाला आहे. त्यामुळे हा पूल केव्हाही कोसळण्याची शक्यता असल्याने याचा रेल्वे प्रवाशांना सुध्दा धोका पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही.हाच धोका ओळखून रेल्वे विभागाने जिल्हाधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र देऊन जीर्ण उड्डाणपुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद करुन हा उड्डाणपूल सहा महिन्यात पाडण्याचे पत्र २०१८ मध्ये दिले होते. यानंतर प्रशासनाने जीर्ण उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन हा पूल वाहतुकीसाठी योग्य आहे का याची चाचपणी केली होती. त्यात सुध्दा उड्डाणपूल जीर्ण झाला असून तो वाहतुकीसाठी योग्य नसल्याचा अहवाल दिला.त्यानंतर नव्या पुलाच्या बांधकामासाठी शासनाकडून यासाठी ८४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.तसेच जुना उड्डाणपूल पाडण्यासाठी ६ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला. कामाला लगेच सुरूवात करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले होते. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वेळकाढू धोरणामुळे पूल तोडण्याची निविदा प्रकिया पुर्ण करायला ४ वर्ष लागले.त्यातही आता पूल पाडण्यास सुरवात झाली,मात्र मुख्य रुळावरील भागच न तोडले गेल्याने नवीन पुलाच्या बांधकामाचाही मुहूर्त कधी निघेल हे सांगता येणार नाही.

## जुना पूल तोडल्याने वाहतूकीचा ताण

जुना पूल तोडण्यात आल्याने वाहतूकीचा ताण नवीन पुलावर झालेला आहे.त्यासोबतच अडंरग्राऊंड भागात नेहमी वाहतुकीची कोंडी होऊ लागली आहे.ज्या नवीन पुलावरुन वाहतूक सुरु आहे,त्या पुलाबाबतही नागरिकांच्या मनात भिती असून नवीन पूल त्वरीत आणि शहराच्या दोन्ही भागांना व्यवस्थित रित्या जोडणारा सोपस्कर असावा अशी मागणी नागरिकांची आहे.

## उड्डाणपूल पाडण्यासाठी रेल्वेला घ्यावा लागणार मेगा ब्लॉक

शहरातील गोंदिया-बालाघाट मार्गावरील जुना जीर्ण उड्डाणपुलाचा काही भाग हा रेल्वे ट्रॅक परिसरात आहे. त्यामुळे हा पूल पाडण्याचे काम अत्यंत जोखमीचे आहे. रेल्वेच्या अभियांत्रिकी विभागाकडून हा पूल पाडण्यासाठी सर्व तांत्रिक बाबीचा नकाशा, वेळापत्रक, मेगा ब्लॉक कोणत्या कालावधीत घ्यायचा यासंदर्भातील मंजुरीचे पत्र मिळाल्यानंतर पूल पाडण्याचा कामाला सुरुवात केला जाणार आहे. रेल्वे विभागाच्या जेईडी विभागाची मंजुरी मिळताच पुढील प्रक्रिया केली जाणार आहे.

# पोलिसांच्या विशेष पथकाकडून महसूल विभागाची पोलखोल

## साईटोला वाळू घाटावर पोलिसांची धाड,२ कोटीचा मुद्देमाल जप्त

**गोंदियाः-** जिल्ह्यातील तिरोडा, गोंदिया या दोन तालुक्यात प्रामुख्याने रेती तस्कारांचा गोरखधंदा जोमात शुरु आहे. हे सर्वश्रुत असूनही काना-डोळ्यावर हात ठेवून बघ्याची भूमिका बजावणारी महसूल प्रशासन मात्र शासनापुढे ऑलबेल दर्शविण्याचे काम करीत आहे. त्यातही कारवाईच्या नावावर तस्करानना अभय तर वापरासाठी रेती वाहून नेणाऱ्या किरकोळ वाहतूकदारांना कारवाई करुन शाबासकी लाटण्याचे काम करुन घेते. मात्र जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन पिंगळे यांच्या विशेष पथकाने तालुक्यातील साईटोला नदी पात्रात मध्यरात्री सुरु असलेला तस्करांचा खेळ निर्दशनास आणून दिले. दरम्यान घटनास्थळावरुन ४ टिप्पर, २ पोकलँड मशीन जप्त करण्यात आली. या पोलिसांच्या धाड कारवाईतून महसूल विभागाची पोलखोल झाली आहे.

जिल्ह्यातील साईटोला रेतीघाटावर अवैधरित्या वाळूचा उपसा होत असल्याच्या मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस अधिक्षकाच्या विशेष पथकाने धडाकेबाज कारवाई करीत २ कोटी १५ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन १० जणाविरुध्द गुन्हा दाखल केले आहे.आज ५ डिसेंबरला पहाटे ३ ते ६ वाजेदरम्यान साईटोला येथील वैनगंगा नदीपात्रातून वाळूचे उत्खनन करुन वाहतूक करीत असल्याची माहिती मिळताच पथकाने पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे,अप्पर पोलीस अधिक्षक अशोक बनकर यांच्या नेतृत्वात उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनात दवनीवाडा पोलीस ठाणे हद्दीत ही कारवाई केली. कारवाई दरम्यान २ पोकलँड मशीन,४ दहाचाकी टीप्पर,२० ब्रास वाळू सह २ करोड १५ लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

यात टिप्पर क्रमांक एम.एच ३५ ए. एच. १४९९ चे चालक अमर दिगंबर बारबुदे वय ३१ वर्ष रा.दांडेगांव/एकोडी,टिप्पर क्रमांक एम.एच-३५ ए. जे. ५६९९ चे चालक महेश रामचरण शहारे, वय ३५ वर्षे रा. निलागोंदी ता.जि. गोंदिया, टिप्पर क्रमांक एम.एच-३५ ए.जे. ७२९९ चे चालक रामेश्वर हरीराम सरीयाम वय ३६ वर्षे रा. नवेगांव, पो.धापेवाडा ता.जि- गोंदिया, टिप्पर क्रमांक एम.एच - ३५ ए.जे. २९०६ चे चालक दिनेश अनंतराम चौधरी, वय ४० वर्षे रा. नवेगांव, पो. धापेवाडा हे अवैधरित्या गौण खनिजा चे उत्खनन करून वाळूची चोरी करून वाहतूक करतांना मिळून आले. तसेच साईटोला वैनगंगा नदीच्या पात्रात पोकलैंड मशीनने वाळूचे उत्खनन करतांना नदीपात्रात काळया पिवळया रंगाची ह्युंडाई स्मॉर्ट प्लस रोबेक्स - २१५ पोकलैंड मशीन चालक - यशवंत रमेश सोनवाणे, वय ३५ वर्ष, रा. सी. जे. पटेल कॉलेज च्या समोर तिरोडा व पिवळया रंगाची ह्युंडाई स्मॉर्ट प्लस रोबेक्स - २१५ एल कंपनीचे पोकलँड मशीन

चालक - रवीन्द्र दसारामजी शहारे वय २६ वर्षे रा. लोहारा पो. सालेगाव ता. आमगांव आढळून आल्याने पोकलँडमशीनसह ताब्यात घेण्यात आले. सदर प्रकरणी आरोपी टिप्पर चालक व पोकलैंड मशीन चालक हे अवैधरित्या रेती उत्खनन करुन रेती चोरी करुन वाहतूक करतांनी मिळून आल्याने व टिप्पर क्रमांक एम.एच-३५ ए.जे. - ५६९९, टिप्पर क्रमांक एम.एच-३५ ए.जे. ७२९९ व पिवळ्या रंगाची ह्युंडाई स्मॉर्ट प्लस रोबेक्स - २१५ एल कंपनीची पोकलैंड मशीनचे मालक आरोपी नामे लखन बेहलीया वय ३६ वर्ष रा. पाल चौक गोंदिया, टिप्पर क्रमांक एम.एच-३५ ए.एच. १४९९ चे मालक आरोपी आशिष नागपुरे वय ३७ वर्ष,रा.कुडवा गोंदिया,टिप्पर क्रमांक एम.एच-३५ ए. जे. २९०६ चे मालक आरोपी प्रकाश फुन्डे वय ५५ वर्ष रा.मरारटोली गोंदिया,काळया पिवळया रंगाची हह्युंडाई स्मॉर्ट प्लस रोबेक्स - २१५ कंपनीची पोकलैंड मशीनचे मालक आरोपी सरफराज गोंडील वय ३५ वर्ष रा. सेल टॅक्स कॉलोनी गोंदिया यांच्याविरुध्द गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यातील आरोपी क्र. ७ ते १० यांनी आरोपी क्र. १ ते ६ यांना साईटोला घाट वैनगंगा नदी पात्रातून स्वतः चे आर्थिक फायद्याकरीता शासनाचा महसूल बुडवून वाळूचे अवैधरित्या उत्खनन करून वाळूची चोरी करून गुन्हा करण्यास सहाय्य केले आहे. आरोपितांविरुध्द पो. स्टे. दवनिवाडा येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी यांचे कडून २ करोड १५ लाख ६०,०००/- हजार रुपयांचा अवैध वाळूसाठा व उत्खननाकरिता व वाळू चे वाहतुकी करिता वापरलेली वाहने जप्त केली आहेत.



## त्या मशिनवर दंडात्मक कारवाई झालीच नाही

**साईटोला येथील वैनगंगा नदी पात्रातून मार्च २०२२ या महिन्यात पोलिस विभागाच्या स्थानिक गुन्हे शाखा पथकाने धाड कारवाई केली होती. दरम्यान नदी पात्रात एका पोखलँड मशीनला रेती उपसा करित असताना पकडण्यात आले होते. सदर प्रकरण दवनीवाडा पोलिसांकडून गोंदिया तहसील कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे दंडात्मक कारवाईसाठी वर्ग करण्यात होती. मात्र महसूल प्रशासनाने त्या प्रकरणालाही दडपले. सदर मशीन मार्ग बनविण्यासाठी होते, असे दर्शविण्याचे कामही करण्यात आले. त्यामुळे त्या पोखलँड मशीनवर अद्याप कारवाई झाली नाही. तर काल झालेल्या कारवाईतील वाहनांवर दंड ठोठावण्यात येणार का? याकडेही लक्ष लागले आहे.**

## काही अधिकाऱ्यांची लिकिंग

**महसुल व पोलीस प्रशासनातील काही अधिकाऱ्यांचेही रेती तस्करांशी लिकिंग असल्याची चर्चा आहे. त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून एकदा कारवाई झाल्यानंतर पुन्हा कसलीही कारवाई होत नाही. संबंधित तस्कर हा त्यांचा मित्र ठरतो. त्यातूनच तस्करांना अभय मिळत आहे, अशी चर्चा सुरु आहे. जिल्हा पोलीस अधिक्षकांनी याकडे लक्ष केंद्रीत करावे, अशी मागणीही सर्वसामान्य नागरिकांकडून केली जात आहे.**

# अखिल भारतीय पवारी साहित्य सम्मेलन ११ डिसेंबरला पांढुरना येथे



**गोंदिया:** राष्ट्रीय पवार क्षत्रीय महासभा प्रणित पवारी साहित्य कला संस्कृती मंडळाच्यावतीने येत्या ११ डिसेंबरला मध्यप्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील पांढुरना येथे पवार समाज भवनात या आयोजित करण्यात आले आहे. या सम्मेलनाचे सम्मेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यीक ॲड. देवेंद्र चौधरी हे राहणार आहेत. तर उद्घाटक म्हणून माजी आमदार मारोतराव खवसे, व सह उद्घाटक राष्ट्रीय पवार क्षत्रीय महासभेचे अध्यक्ष इंजि. मुरलीधर टेंभरे उपस्थित राहणार आहेत. या सम्मेलनाचे स्वगाताध्यक्ष पवार समाज संगठन पांढुरनाचे अध्यक्ष भाकचंद देशमुख व सह स्वागताध्यक्ष गणेश मंदिर समितीचे अध्यक्ष तानबाजी बारंगे हे आहेत. या साहित्य सम्मेलनात ज्येष्ठ साहित्यीक बोरकन्हार, जीवन गौरव पुरस्कार ॲड. लखनसिंह कटरे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. सम्मेलनाला मुख्य अतिथी म्हणून उद्यानिकी महाविद्यालय छिंदवाडाचे अधिष्ठाता डॉ. विजय कुमार पराडकर, तसेच विशेष अतिथी म्हणून सतपुडा आंचलिक साहित्य परिषदेचे संचालक संजय पठाडे, पवार समाज शिवनी जिल्हाध्यक्ष इंजि. नलिन सहारे, ज्येष्ठ साहित्यीक हेमेंद्र क्षीरसागर, इंजि. राजेंद्र किशोर रहांगडाले, हरीभजन बिरगडे उपस्थित राहणार आहेत. या सम्मेलनात डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे, ॲड. लखनसिंह कटरे, ॲड. देवेंद्र चौधरी, तुकाराम किनकर, यादोराव चौधरी, छगनलाल रहांगडाले,रामचरण पटले यांच्या साहित्य पुस्तकाचे विमोचन करण्यात येणार आहे.तसेच या साहित्य सम्मेलनात

कवि रत्न तुकाराम किनकर, यादोराव चौधरी, सौ. उषाबाई रमेश पटले, गायक रत्न रामचरण पटले, कु. पायल गौतम, लेख रत्न चिरंजीव बिसेन, सी.एच.पटले, पवारी बोली शोधार्थी तुफान सिंह पारधी, इंजि. सुरेश देशमुख आदिंचा गौरव करण्यात येणार आहे. या साहित्य सम्मेनाला समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# बुध्दगयेत महाराष्ट्र सदन होणार-माजी मंत्री बडोलेंचा पुढाकार

**मुंबई-**माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेतली . त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ४ डिसेंबरला नागपुरात भेट घेतली. या भेटीत बुद्धगया येथे महाराष्ट्र सदन उभारण्याची मागणी केली. या सदनात सुमारे ५०० बौध्द बांधव व भंतेजी एकाचवेळी थांबू शकतील अशी व्यवस्था करावी असेही मागणी केली.

बडोले यांनी ना.शिंदे व ना. फडणवीस यांना सांगितले की, महाराष्ट्रातील बौद्ध उपासक उपासिका आणि बौद्ध भिक्खू मोठ्या प्रमाणात बुध्दगयेला जातात. तिथे त्यांची निवासाची सोय होत नाही. ही गैरसोय लक्षात घ्यावी. ती दूर करण्यास तिथे दिल्लीच्या धर्तीवर महाराष्ट्र सदन उभारावे अशी मागणी केली. या मागणीला उभय दोन्ही नेत्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. तसेच याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना सामाजिक न्याय आणि वित्त खाते,सार्वजनिक व पर्यटन खात्याच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. त्या प्रस्तावावर तातडीने बैठक घेण्याचेही आश्वासन देण्यात आले.

महाराष्ट्रातून दररोज मोठ्या प्रमाणामध्ये बौद्ध भिक्खू, बौद्धबांधव जातात. वर्षाचा हा आकडा सुमारे दहा लाखांवर असतो. बुद्ध गया येथे तथागत गौत्तम बुद्ध यांना ज्ञान प्राप्ती झाली. त्यामुळे संपुर्ण जगातील बौद्ध धर्मीयांसाठी हे स्थळ अतिशय पवित्र स्थान आहे. हे स्थळ भारतात असणे गौरवाची बाब आहे. मागील अनेक वर्षापासून ही मागणी सातत्याने होत होती. महाराष्ट्र सदन उभारण्यास लागणाऱ्या जागेच्या संदर्भात बिहारचे मुख्यमंत्री नितिशकुमार त्यांच्याशी चर्चा करण्याचेही या दोन्ही भेटीत ठरले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नावर लगेच बैठक लावण्याचे आश्वासन माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांना दिले. तसेच अधिकाऱ्यांना तातडीने बैठक लावण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे भविष्यात महाराष्ट्रातील जे बौद्ध उपासक, उपासिका आणि बौद्ध धम्म बांधव मोठ्या प्रमाणामध्ये बुद्ध गया येथे जातात. त्यांची निवासाची सोय त्या ठिकाणी होईल. त्या ठिकाणी एकावेळी सुमारे ५०० उपासक, उपासिका आणि बौद्ध भिक्खु राहु शकतील असा विश्वास माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी व्यक्त केला.

# संविधानाचे महत्व व बाबासाहेबांचा जीवन परिचय उलगडणारे छायाचित्र प्रदर्शन - माहिती आयुक्त राहुल पांडे



**नागपूर** ,दुर्मिळ छायाचित्रांद्वारे संविधानाच्या निर्मितीचा इतिहास व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाविषयीची माहिती सांगणारे “भारताचे संविधान व महामानवाचा जीवन प्रवास” छायाचित्र प्रदर्शन लावण्यात आले आहे. जिल्ह्यातील नागरीक व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला आवर्जुन भेट देऊन माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी केले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर, पत्र सूचना कार्यालय, नागपूर आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनच्या प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, नागपूर, सहाय्यक आयुक्त कार्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दीक्षाभूमी मार्गावरील सामाजिक न्याय भवनाच्या परिसरात आयोजित “भारताचे संविधान व महामानवाचा जीवन प्रवास” या विषयावर आधारीत छायाचित्र प्रदर्शनाचे उदघाटनप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ताताई कोकड्डे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनच्या नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे जात पडताळणी समितीचे अध्यक्ष सचिन कलंत्रे, प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिध्दार्थ गायकवाड, पत्र सूचना कार्यालय, नागपूरचे उप संचालक शशीन राय, केंद्रीय संचार ब्युरोच्या क्षेत्रीय कार्यालय, नागपूरचे प्रभारी सहाय्यक संचालक हंसराज राऊत, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलकिशोर फुटाणे, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त सुकेशनी तेलगोटे, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी किशोर भोयर प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ताताई कोकड्डे म्हणाल्या, दुर्मिळ छायाचित्राद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन प्रवासाची माहिती नागरीकांना उपलब्ध करून देण्यासाठी अशा प्रकारचे प्रदर्शन नियमितपणे लावणे आवश्यक आहे. नागरीकांनी सदर प्रदर्शनाला भेट देऊन संविधान व बाबासाहेबांच्या जिवन प्रवासाची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा म्हणाले, संविधानाचे महत्व सांगण्यासाठी, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन प्रवासाची माहिती सांगणारे दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, नागपूर यांनी चांगला उपक्रम राबविला आहे. माहिती जाणून घेण्यासाठी विद्यार्थी व नागरीकांनी प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी केंद्रीय संचार ब्यूरोचे सहायक संचालक हंसराज राऊत यांच्या हस्ते माहिती आयुक्त राहुल पांडे, जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ताताई कोकड्डे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांना भारताचे संविधान प्रास्ताविकाचे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला.

सदर प्रदर्शन ८ डिसेंबर २०२२ पर्यत सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यत चालणार आहे. या प्रदर्शन नागरीकांसाठी निःशुल्क असून नागरीकांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर, नागपूर, पत्र सूचना कार्यालय, नागपूर आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनच्या प्रादेशिक उपायुक्त कार्यालय, नागपूर, सहाय्यक आयुक्त कार्यालय, नागपूर यांच्यामार्फत करण्यात आले आहे. प्रदर्शनाच्या यशस्वितेसाठी केंद्रीय संचार ब्यूरो, महाराष्ट्र-गोवा राज्याचे अतिरिक्त महासंचालक स्मिता वत्स शर्मा, उपसंचालक निखील देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी सहायक संचालक हंसराज राऊत, सहाय्यक प्रचार अधिकारी/तांत्रिक सहायक संजय तिवारी, संजीवनी निमखेडकर, नरेश गच्छकायला, संतोष यादव यांच्यासह इतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.





**मुंबइः** भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी रुजविलेली स्वातंर्त्य, समता आणि बंधुता ही तत्त्वे सर्वव्यापी आहेत, असे गौरवोद्गार राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी काढले.

दादर येथील चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित शासकीय कार्यक्रमात राज्यपाल बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड, खासदार राहुल शेवाळे, आनंदराज आंबेडकर, मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिन समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले की, भारताच्या संविधानामुळे सर्वांना प्रत्येक क्षेत्रात संधी मिळतात. त्याचे श्रेय आपल्या राज्यघटनेला जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचितांमध्ये आत्म विश्वास निर्माण करण्याचे केलेले काम हे अत्यंत मोठे आहे. भारत घडविण्यात डॉ.बाबासाहेबांचे मोठे योगदान आहे. त्यांचे विचार पुढे नेण्याचे काम करूया, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**इंदू मिल येथील डॉ.बाबासाहेबांचे स्मारक लवकरच पूर्ण होईल - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाने सर्वसामान्यांना जगण्याचा हक्क दिला. डॉ. बाबासाहेब यांचे विचार व कार्य जागतिक पातळीवर पोहोचावे यासाठी इंदू मिल येथील स्मारकाचे काम लवकरात-लवकर पूर्ण होण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. डॉ. बाबासाहेबांनी सर्वसामांन्याना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली.सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून डॉ. बाबासाहेब यांनी राज्यघटना दिली, वैचारिक बळ देऊन गुलामगिरीतून बाहेर पडण्याची प्रेरणा दिली. ङ्गशिका, संघटित व्हा, संघर्ष कराफ्र हा मूलमंत्र दिला. त्यांच्या विचारांवर राज्य सरकार वाटचाल करीत आहे.मुख्यमंत्री म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आठवणी आणि ऐतिहासिक ठेवा जोपासला जाईल. सर्वसामान्यांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार कार्यरत राहील. राज्यात शासकीय वसतिगृहांची संख्या वाढवण्यावर भर देण्यात येत आहे, शिष्यवृत्ती वाढविली जात आहे. सर्वसामान्यांच्या उत्थानासाठी निर्णय घेतले जात आहेत. नुकतेच स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय स्थापन केले आहे, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**जगात सर्वोत्तम संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जगाच्या पाठीवरील सर्वोत्तम संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले. सर्वसामान्य व्यक्तीला सर्वोच्च स्थानी जाण्याची संधी आपल्या संविधानामुळे मिळाली आहे. आजचा दिवस भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प करण्याचा आहे. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून देशाची दिशा बदलण्याचे काम केले. सर्वसामान्य व्यक्तीला समान अधिकार दिले. कोणताही भेद करता येणार नाही असा बीजमंत्र त्यांनी आपल्याला दिला. समता, बंधुत्व, मानवतेचा संदेश दिला. गौतम बुद्धांचे विचार समाजात रुजविण्याचे काम संविधानाच्या माध्यमातून केले. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदीदेखील ङ्गदेशाच्या संविधानामुळे आपल्याला सर्वोच्च स्थानी पोहोचता आले’ याचा आवर्जून उल्लेख करतात. संविधानाची खरी शक्ती ही आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अतिभव्य स्मारकाचे काम लवकरच पूर्ण केले जाईल, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.यावेळी मुंबई महापालिकेच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेषांकाचे वितरण मान्यवरांना करण्यात आले.दिव्यांग विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार असलेल्या माहिती पुस्तिकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



## संपादकीय

### कारागृह खचाखच; नवीन कधी उभारणार?

राज्यातील वाढत्या गुन्हेगारीमुळे कैद्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ होताना दिसत आहे. या कैद्यांना बंदिस्त ठेवण्यासाठी राज्यातील कारागृह आता अपुरी पडू लागली आहेत. ठाणे आणि मुंबई कारागृहांवरील ताण कमी करण्यासाठी नवी मुंबईत तळोजा येथे कारागृह सुरू करण्यात आले असले तरी ठाणे आणि मुंबईतील कारागृहांमध्ये त्यांच्या अधिकृत क्षमतेपेक्षा दुपटीने कैदी कोंडण्यात येत आहेत. उदाहरण द्यायचे झाल्यास राज्यातील सर्वात मोठ्या येरवडा कारागृहात एकूण क्षमतेच्या तीनपट कैद्यांची संख्या झाल्याने प्रशासनावर प्रचंड ताण वाढला आहे. कारागृहात कैद्यांना झोपण्यासाठी पुरेशी जागा मिळत नसल्याने दाटीवाटीने राहावे लागण्याची वेळ ओढवली आहे. कैद्यांची संख्या सात हजारांच्या पुढे गेल्यास नवीन कैद्यांना "प्रवेश' न देण्याच्या विचारात प्रशासन आहे. पण नव्या कैद्यांना कारागृहात ङ्गनो एंट्रीफकेल्यास गुन्ह्यातील नवीन आरोपींना कोठे ठेवायचे? हा प्रश्नही गंभीर झाला आहे.

राज्यातील कारागृह हाऊसफुल्ल असून, कैद्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे सरकारने लक्ष द्यावे, यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर खंडपीठाने राज्य सरकारला आपले म्हणणे मांडायला सांगितले होते. कारागृहातील कैद्यांच्या वाढत्या संख्येवर काय उपाययोजना करणार? अशी विचारणा खंडपीठाने केली होती. त्यावर राज्यातील कारागृहांची संख्या वाढवणार असल्याची माहिती राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयात दिल्याने भविष्यात कैद्यांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन १५ हजार कैद्यांना सामावून घेण्याची क्षमता असलेली आणखी १४ कारागृहे उभारण्याची प्रक्रिया राज्य सरकारने सुरू केली आहे. दस्तुरखुद्द राज्य सरकारतर्फे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांना प्रतिज्ञापत्र दाखल करुन ही माहिती द्यावी लागली. त्यामुळे हे प्रकरण न्यायालयाने किती गंभीरतेने घेतले आहे, ते दिसून आले.

सद्यस्थितीला राज्यात ३६ कारागृहे असून त्यामध्ये २३ हजार २१७ कैद्यांना ठेवण्याची क्षमता आहे. प्रत्यक्षात मात्र या कारागृहांमध्ये ४२ हजारांहून अधिक कैदी बंदिस्त आहेत. ही स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने आणि भविष्यातील गरज लक्षात घेऊन अहमदनगर, बारामती, पालघर, हिंगोली, गोंदिया, भुसावळ येथे अतिरिक्त कारागृहे बांधण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. येरवडा (पुणे) आणि ठाणे मध्यवर्ती कारागृहांच्या जमिनींवर दोन अतिरिक्त कारागृह बांधण्यात येणार आहे. त्यामुळे या कारागृहांत कैद्यांना ठेवण्याची क्षमता ९ हजार ५४९ ने वाढणार आहे, असेही सरकारने प्रतिज्ञापत्रातून स्पष्ट केले आहे.

कारागृहांतील गर्दीबाबत जनअदालत या संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर या आधी निकाल देताना या समस्येवर तोडगा काढण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती एस. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने कारागृहे कशी असावीत? यासह त्यांची संख्या वाढवण्याचीही शिफारस केली होती. समितीने केलेल्या शिफारशींवर आवश्यक त्या उपाययोजना करण्यात असल्याचा दावाही सरकारने केला. दरम्यान मुंबईसह अलिबाग, सातारा, सांगली, नांदेड व बीड येथे आणखी ६ कारागृहे प्रस्तावित असून त्याच्यासाठी जागेचा शोध सुरूआहे, तर येरवडा, कोल्हापूर, नागपूर, अमरावती आणि अकोला येथे आणखी ५ खुल्या कारागृहांचा प्रस्ताव असल्याचे सरकारने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. राज्यातील कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी आहेत.

राज्यभरातील कारागृहात बंदिस्त असलेल्या ३७ हजार ६७९ कैद्यांवर राज्य सरकारने २०१७ ते २०१८ या आर्थिक वर्षांत २८० कोटी रुपये खर्च केल्याची माहिती समोर आली आहे. त्यातून क्षमतेपेक्षा अधिक कैदी असल्याची बाब सरकारी आकडेवारीवरुन दिसून येते आहे. राज्यात नऊ मध्यवर्ती, २८ जिल्हा कारगृहे, खुली, महिला, किशोर आणि विशेष अशी १३ कारगृहे तसेच १४ खुली वसाहत, अशी एकूण ५४ कारागृहे होती. या कारागृहांची कैदी ठेवण्याची एकूण क्षमता २३ हजार ९४२ होती. मात्र प्रत्यक्षात कैद्यांची संख्या जास्त असल्यामुळे त्याविरोधात आवाज उठवण्यात आला. त्यामुळे गृह विभागाने वर्ग तीनची ६ नवीन जिल्हा कारगृह सुरूकेली. त्यामुळे राज्यातील कारागृहांची संख्या आता ६० वर गेली आहे. राज्यातील ९ प्रमुख जिल्ह्यांमध्ये मध्यवर्ती कारागृह आहेत. वर्ग एकची १९ जिल्हा कारगृह आहेत, तर वर्ग दोनच्या जिल्हा कारागृहांची संख्या २३ इतकी आहे. मध्यवर्ती कारागृहांमध्ये १४ हजार ३८९ पुरुष आणि ४५२ महिला कैद्यांना ठेवण्याची क्षमता आहे.

राज्यातील कारागृहात कैद्यांची संख्या क्षमतेपेक्षा अधिक झाल्याने अमेरिकेतील मियामी कारागृहाच्या धर्तीवर आणि सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर नवीन कारागृहे उभारण्यासाठी सरकारला कारागृह विभागाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. राज्यातील प्रमुख कारागृहातील कैद्यांचा वाढता ताण लक्षात घेता विशेषतः मुंबई आणि पुण्यात प्रत्येकी पाच हजार कैद्यांचे बहुमजली कारागृह उभारण्यात येऊ शकतात. कैद्यांच्या प्रश्नांवर खंडपीठाने दखल घेतल्याने भविष्यात परिस्थिती बदलेली असेल, अशी आशा करायला हरकत नाही.

# शिक्षणप्रेमी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि विद्यार्थी



शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे. त्यासाठी समाजाच्या सर्व थरांपर्यंत शिक्षण गेले पाहिजे. त्याकाळी तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये, समाजाच्या चुकीच्या विचारसरणीमुळे बहुजनांना शिक्षणाचे दरवाजे बंद होते. बाबासाहेबांचे (Babasaheb Ambedkai) वडील सैन्यात असल्याने विशेष शाळेत त्यांना प्राथमिक शिक्षण मिळाले. विद्यार्थी दशेपासून बाबासाहेबांनी जातिभेद, अपमानाकडे दुर्लक्ष करीत आपले शिक्षण चालू ठेवले. मॅट्रिकच्या शिक्षणानंतर बडोद्याच्या सयाजी गायकवाड यांनी त्यांची प्रखर बुद्धिमत्ता पाहून, शिष्यवृत्तीवर शिकायला परदेशात पाठविले.

बाबासाहेब चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांचे यश साजरे करताना दादासाहेब केळुसकरांनी "बुद्धाचे चरित्र' हे पुस्तक भेट दिले होते. नकळत त्याच पुस्तकांनी त्यांना साद घातली. गुरू गौतम बुद्धांची शिकवण आणि महात्मा फुलेंच्या कार्याचा त्यांच्या जीवनावर प्रभाव होता. संत कबीर आणि शाहू महाराजांना बाबासाहेब गुरूमानीत.

**लंडनमध्ये घडलेली छोटी घटना**

बाबासाहेब, लंचब्रेकमध्ये ग्रंथालयात बसून ब्रेड खाताना ग्रंथपाल यहुदीने त्यांना पकडले. दंड आकारला, त्यांची सदस्यता रद्द करणाऱ्यांची धमकी दिली. बाबासाहेबांनी प्रथम माफी मागत नम्रपणे मी येथे कोणत्या कारणासाठी आलो ते खरे सांगितले. कॅफेमध्ये खाण्यासाठी माझ्याकडे वेळ आणि पैसाही नाही. त्यांचे प्रामाणिक उत्तर ऐकल्यावर ग्रंथपाल यहुदी म्हणाले, आजपासून मी माझे जेवण तुमच्याबरोबर वाटून खाणार.

परदेशात शिकत असताना, नवा देश, नवी संस्कृती, नवे ज्ञान अनुभवले. माणसा-माणसांतील संबंधातील जाण आली. भेदभावाची कृत्रिम बंधनं नसलेला मुक्त समाज पहिला. शिक्षणाबरोबर बाबासाहेबांचे व्यक्तिमत्वही विकसित झाले. त्यांनी ओळखले, समाजातील परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षणाला पर्याय नाही.

बॅरिस्टर होऊन डॉ. बाबासाहेब भारतात आल्यावर आपल्या बांधवांचे, दलितांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले; नव्हे त्यासाठीच भारतात आले. गुलाम गिरीच्या बेड्या तोडून प्रथम त्यांना ताठ मानेने, स्वाभिमानाने जगायला शिकविले. निर्भय केले. शोषित वर्गाचे शिक्षण झालेच पाहिजे, हा बाबासाहेबांचा आग्रह. त्यांनी शिक्षण घ्यावे म्हणून त्यांच्या वसतिगृहाची, रात्रीच्या शाळेची सोय करून, शिक्षणाची प्रेरणा दिली. "शका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश सगळ्यांना दिला. त्यासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटी, कालांतराने सिद्धार्थ, मिलिंद या मुंबई, औरंगाबाद येथे शिक्षण संस्था काढल्या.

त्या आधी दलित बांधवांच्या व्यथा मांडण्यासाठी शाहू महाराजांच्या मदतीने "मूकनायक', बहिष्कृत ही पाक्षिके; समाजाच्या, दलितांच्या विकासासाठी विविध वृत्तपत्रे, नियतकालिके चालवली. तरुणांसाठी क्रीडा मंडळे, विधायक संस्था, परिषदा, सभा-मेळाव्यांतून शिक्षणाचे महत्त्व सांगत होते.

"बहिष्कृत हितकारिणी' या संस्थेपासून डॉ. बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने सार्वजनिक आयुष्याला सुरुवात केली. "शिकवा, चेतवा आणि संघटित करा' या "हितकारिणी' संस्थेच्या ब्रीद वाक्यांत शिक्षणाला अग्रक्रम होता. दादासाहेब गायकवाडांना पत्रात लिहितात, "आपण इंग्रजीचा अभ्यास चालू ठेवायला हवा. इंग्रजीचे अज्ञान सार्वजनिक कामात पदोपदी नडेल, तरी इंग्रजीकडे दुर्लक्ष करू नका.' यावरून शिक्षणविषयक त्यांचा प्रगल्भ दृष्टिकोन दिसून येतो. महात्मा फुल्यांचा, सामाजिक, शैक्षणिक विषमता निर्मूलनाचा वारसा आंबेडकरांनी समर्थपणे पुढे नेला.

विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षणसंस्थेचे निर्माते असा शिक्षणक्षेत्रात बाबासाहेबांचा चढता आलेख आहे. ते म्हणतात, "प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण हा राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे.' म्हणून १४ वर्षापर्यंतचे प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीचे आणि मोफत केले पाहिजे.

डॉ. बाबासाहेबांचे ज्ञान, वाचन, व्यासंग, लेखन, चिंतन आणि वक्तृत्व असे चौफेर व्यक्तिमत्त्व. त्यांचा स्वतःचा मोठा ग्रंथसंग्रह होता. स्वतः ते अठरा-अठरा तास अभ्यास करीत. शिक्षणासाठी जगभ्रमंती करून, आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करून, अनेक विषयांत प्रभुत्व, अनेक पदव्या, अनेक भाषा प्राप्त केल्या होत्या. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांचा पुतळा किंवा चित्र पुस्तकांशिवाय पूर्ण झालेले दिसत नाही.

डॉ. बाबासाहेबांची विद्वत्ता, शैक्षणिक योग्यता, प्रतिभा व्यापक आणि भव्य होती. म्हणून त्यांना "जगातील सर्वात बुद्धिमान व्यक्ती' तसेच "सिम्बॉल ऑफ नॉलेज' म्हणून ओळखले जाते.

बाबासाहेबांचे विद्यार्थ्यांशी अतूट संबंध होते. "विद्यार्थ्यांनो जागृत राहा' या लेखात त्यांनी त्यांचे शिक्षण काळातील क्षणा-क्षणाचे महत्त्व विशद केले आहे. ते सांगतात, "काय शिकावं, हे विद्यार्थ्यांनी पाहिले पाहिजे. स्वतःची लायकी विद्यार्थीदशेतच वाढवा.' ज्ञान प्राप्त करण्याच्या संदर्भात म्हणतात, "विद्यार्थ्यांनो तुम्ही नुसते शिक्षण घेऊ नका, जे शिक्षण घ्याल, त्यात स्वतःला सिद्ध करा.'

पुणे येथील एका संमेलनात डॉ. आंबेडकर म्हणाले, "मी आजन्म विद्यार्थी आहे.' अति उच्च दर्जाची विद्वत्ता, ज्ञान असतानाही स्वतःला आजन्म विद्यार्थी मानणं आणि ते आदर्श विद्यार्थी ठरले, म्हणून शासनाने राज्यांत त्यांचा शाळा प्रवेशाचा दिवस (७ नोव्हेंबर) हा विद्यार्थी दिन म्हणून पाळला जातो.

**डॉ. आंबेडकरांचे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक विचार**

१. राष्ट्रहित आणि समाजहिताचे भान ठेवते ते खरे शिक्षण.
२. शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुला-मुलींना शिकू द्या. बालपणीच लग्न करू नका. शिक्षणामुळे आचार-विचारात बदल होतो.
३. मुला-मुलींच्या मनातील न्यूनगंड दूर करून त्यांना परंपरागत कामात न गुंतवता महत्त्वाकांक्षी बनवा.
४. विद्यार्थ्यांमध्ये राजकीय विचार रुजवावेत यासाठी ते सतत प्रयत्नशील होते.
५. विद्यार्थ्यांनी चाळीचाळीत जाऊन अज्ञान व खुळ्या समजुती दूर केल्या पाहिजेत.
६. मी प्रवास करताना मजजवळ नेहमी चार पुस्तके व वर्तमानपत्र असतात.
७. मला माणसांच्या सहवासापेक्षा पुस्तकांचा सहवास अधिक आवडतो.
८. देशाच्या विकासासाठी, बाबासाहेबांना त्यांचा विद्यार्थी हा भारतासाठी जगणारा, विज्ञानवादी असायला पाहिजे.
९. आपण राजकीय चळवळीला जेवढे महत्त्व देतो, तितके शिक्षण प्रसाराला देत नाही.
१०. डॉ. आंबेडकरांच्या मते व्यक्तीला; अस्तित्वाची, क्षमतेची आणि सामर्थ्याची जाणीव करून देते ते शिक्षण! निर्भय व्हा आणि जगाचे राज्य मिळवा.

शिक्षणप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "लोकशिक्षण' या नात्याने अनेक शैक्षणिक कार्य केले. ते सांगतात, "विद्यार्थ्यांनो लक्षात ठेवा, शिक्षणाअभावी माणूस सर्वस्व गमावतो. सर्व मानव जन्मजात समान असून प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार आहे. त्यासाठी सर्वांनी शिकले पाहिजे.'

६ डिसेंबर, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन!

**- मृणालिनी कुलकर्णी**

# फुलचूर हायस्कूल शाळेत भूकंपकृती रंगीत तालीम

## विद्यार्थ्यांनी घेतले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



**गोंदिया:** नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीच्या वेगवेगळ्या घटनांमध्ये तात्काळ प्रतिसाद देऊन जीवित व वित्तीय हानीचे प्रभाव कमी करून विविध आपत्ती पासून स्वतःचे व इतरांचे संरक्षण कसे करावे व या दरम्यान कोणत्या कृती करावी? याबाबतची माहिती व प्रात्यक्षिक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,गोंदिया व नागरी संरक्षण विभागातर्फे दि.०१ डिसेंबर २०२२ रोजी फुलचूर हायस्कूल शाळेतील विद्यार्थ्यांना मॉकड्रिल द्वारे देण्यात आली.

यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, अग्निशमन अधिकारी लोकचंद भेंडारकर, नागरी संरक्षण दलाचे इंद्रकुमार बिसेन, पवन जगणे व रिका इंडियाचे परियोजना व्यवस्थापक विपुल नकुम, भारती सामाजिक सेवा संस्थेचे संचालक जयंत शुक्ला, मुख्याध्यापक तेजराम तरोणे,डॉ. सोनाली गौतम , शालू राऊत, के.एस. बावनकार प्रामुख्याने उपस्थित होते.

शालेय विद्यार्थ्यांची आपत्ती व्यवस्थापनात भूमिका व कृति या विषयास अनुसरून रंगीत तालीम कार्यक्रमाचे आयोजन फुलचुर हायस्कूल, फुलचुर येथे करण्यात आले होते. यामध्ये उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना भूकंपाची माहिती व दरम्यान करावयाच्या कृती इत्यादी बाबत सविस्तर माहिती देण्यात आली व मॉकड्रिलच्या माध्यमातून स्वतःचे संरक्षण कसे करावे? याबाबत प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

दैनंदिन जीवनात आगीच्या अनेक घटनेमुळे जीवित व वित्तीय हानीच्या घटना घडतात. त्यामुळे आगीपासून सुरक्षा व बचाव या विषयावर रंगीत तालीम घेऊन अग्निशमन यंत्राचा वापर कसा करावा? याबाबतची माहिती व प्रात्यक्षिक रंगीत तालीमेद्वारे उपस्थित विद्यार्थ्यांना देण्यात आले.

मान्सून कालावधीत पावसाळ्यात पूरपरिस्थिती कालावधीत शोध व बचाव कामात उपयोगी रबर/फायबर बोटी, लाइफ जॉकेट, लाइफ बॉय, इमरजेंसी लाईट, जइच मशीन, टाकाऊ वस्तूंपासून तयार करण्यात आलेले फ्लोटिंग डिवाइस, सर्चलाईट, सेटेलाईट फोन, मेगाफोन इत्यादी सर्व साहित्यांची इत्यंभूत माहिती शाळेतील उपस्थित विद्यार्थ्यांना देण्यात आली.

सदर कार्यक्रमात मा.ट्रेनर व शिक्षक गिरधारी पारधी, ओ. जे. कटरे, आर. बी. शेंडे, पी.सी. मेंढे, पी.ए. सूर्यवंशी, एम.टी. तारोणे, एस. एस. यादव, ए. एस. राऊत, बी. एस. दलाल, एम. एल. गौतम, आर. के. पटले, सत्यम बिसेन, जितेंद्र गौर तथा शोध बचाव पथकाचे सदस्य नरेश उईके, राजकुमार खोटेले, जसवंत रहांगडाले, रविंद्र भांडारकर, संदीप कराडे, दिनू दिप, राजाराम गायकवाड, महेंद्र ताजने, दुर्गा प्रसाद गंगापारी, मनोज केवट, (चालक) मंगेश डोये, गृहरक्षक चुन्नीलाल मुटकुरे, चिंतामण गिन्हेपुंजे, शेखर शरणागत प्रामुख्याने उपस्थित होते.

# जि.प.उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणविर ग्लोबल बुद्दिस्ट पुरस्काराने सन्मानित



गोंदिया- गोंदिया जि.प.उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण क्रीडा व आरोग्य इंजि.यशवंत गणविर ग्लोबल बुद्दिस्ट अम्बेसिडर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.बुद्दिस्ट रिसर्च सेंटर व्हिएतनाम ,त्रिरत्न भुमी फाऊंडेशन व गगन मलिक फाऊंडेशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे सुर्यवंशी क्षत्रिय सभागृह दादर हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. तळागाळातील सर्व सामान्य माणूस अशी प्रतिमा असलेले इंजि.यशवंत गणविर यांना हा पुरस्कार मिळाला असून जिल्ह्यातील जनतेच्या गौरवाची बाब आहे.एक सामान्य कार्यकर्ता ते जि.प.उपाध्यक्ष असा प्रवास करणारे एक अन्यन साधारण व्यक्तीमत्व म्हणून यशवंत गणविर यांना ओळखले जात असून अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गोठणगाव जिल्हा परिषद क्षेत्राचे ते लोकप्रतिनिधी आहेत. त्यांना मिळालेल्या पुरस्काराकरीता सर्वत्र त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# आदिवासी जमीन प्रत्यार्पण कायद्याचा लाभ की दुरूपयोग


**गोंदिया:** महाराष्ट्र शासनने १९७४ ला महाराष्ट्रातील आदिवासींच्या जमिनीचे प्रत्यार्पण संदर्भात महाराष्ट्र रिस्टोरेशन ऑफ लँड टू शेडयूल ट्राइब कायदा १९७४ ला पारित केला. या कायद्याचा उद्देश आदिवासी जमातीच्या अज्ञानाचा फायादा घेऊन बिगर आदिवासी जमिनी खरेदी करत आहेत. त्या हस्तांतरणाला आळा घालण्याकरिता हा कायदा करण्यात आला. आणि जमिन हस्तंतरणाबाबत काही नियम व अटी घालण्यात आल्या, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ च्या कायद्यामध्ये १९७४ ला काही सुधारणा करण्यात आल्या आणि कलम ३६ व ३६व अनुसार माननीय जिल्हाधिकारी व शासनाची परवानगी घेतल्याशिवाय जमीन हस्तांतरण होऊ शकरणार नाही असे स्पष्ट केले.

या कायद्यामध्ये फक्त आदिवासी जमातीच्या जमिनी हस्तांतरण व परत करण्यासंदर्भात कलम ३ आणि ४ मध्ये नमूद करण्यात आले. आदिवासी जमाती असल्याचा पुरावा जात प्रमाणपत्र तसेच त्याची वैधता सादर करणे आवश्यक केल्या गेले. पण अलीकडे या कायद्याच्या दुरुपयोग होतानाही दिसत आहे. आदिवासी जमात असल्याचे सांगून जमीन परत करण्याकरिता अर्ज केले जात आहेत. मात्र जातीचा दाखला सादर न करताच काही बिगर आदिवासींच्या जमीनी परत करण्याचे आदेश झाल्याचे दिसून येत आहेत.

अशीच एक घटना देवरी तालुक्यातील मौजा शेरपार येथील शेतकरी खिरचंद धनलाल ठाकुर, मूलचंद धनलाल ठाकूर व देवचंद धनलाल ठाकूर यांची जमीन परत करण्यासंदर्भात दिनांक १२.१.२०२२ ला तहसीलदार देवरी यांनी जमीन परत करण्याचे आदेश पारित केले. तहसीलदार देवरी यांनी अर्जदाराचे स्वत:चे जात प्रमाणपत्र, त्याची वैधता तसेच रहिवासी दाखला सादर न करतानाही तहसीलदार देवरी यांनी जमीन परत करण्याचे आदेश पारित केले.

त्या आदेशाविरुद्ध गैर आदिवासी खिरचंद धनलाल ठाकूर, मूलचंद धनलला ठाकूर व देवचंद ठाकूर मौजा शेरपार ता.देवरी यांनी महाराष्ट्र महसूल प्राधिकरण नागपूर येथे अपील दाखल केले. पण सध्या महाराष्ट्र महसूल प्राधिकरण नागपूरला सदस्य उपलब्ध नसल्याने अपील कर्ता यांनी औरंगाबाद बेंच महाराष्ट्र महसूल प्राधिकरणाकडे धाव घेतली आणि सदर जमीन प्रत्यार्पण थांबविण्याकरिता अपील सादर केला. महाराष्ट्र महसूल प्राधिकरण औरंगाबाद खंडपीठ वि.के. कदम यांनी सदर जमीन प्रत्यार्पण करण्यासंदर्भात स्टे ऑडर पास केला. सदर प्रकरणात अपीलकर्ता धनलला ठाकूर, मूलचंद ठाकुर, देवचंद ठाकूर यांच्यावतीने एडवोकेट आदिती योगेश पारधी यांनी बांजू मांडली आणि जमीन परत करण्यासंदर्भात स्टे ऑर्डर पास करुन घेतला.

# नागरिकांनी केल्या स्वत:जवळील भरमार बंदूका पोलिसांच्या स्वाधीन



**गडचिरोली:** दरवर्षीप्रमाणे यावषीही नक्षल्यांच्यावतीने २ ते ८ डिसेंबर या कालावधील पीएलजी सप्ताह पाळल्या जात आहे. या नक्षल सप्ताहादरम्यान पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलिस अधीक्षक (अभियान) अनुज तारे यांच्या नेतृत्वात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले असून, उपविभाग अहेरी अंतर्गत उपपोस्टे पेरमिली हद्दतील नागरिकांनी ८ भरमार बंदुका व १ बॅरल पोलिसांच्या स्वाधीन केल्या.

गडचिरोली जिल्ह्यात मोठेया प्रमाणावर जंगलक्षेत्र असल्याने येथील दुर्गम-अतिदुर्गम भागातील सामान्य नागरिक आपल्या पारंपारिक शेती व्यवसायासोबत शिकार करून उदरनिर्वाह करीत असते. शिकार करण्यासाठी तसेच वन्य प्राण्यांपासून संरक्षणासाठी अनेक सामान्य नागरिक बंदुका बाळगत असत. अशाच प्रकारच्या वडीलोपाजित बंदुका व शस्त्रे जिल्ह्यातील नागरिकांकडे उपलब्ध आहेत. दुर्गम-अतिदुर्गम भागात नक्षलवादी याच बाबीचा फायदा घेऊन सर्वसामान्य जनतेला नक्षल वळवळीत समाविष्ट करण्याचा प्रयत्न करतात. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांचे संकल्पनेतून अपर पोलिस अधीक्षक अनुज तारे, कुमार चिंता, यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांनी स्वत: जवळ बाळगलेल्या बुदका स्वच्छेने जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये स्वाधिन करण्याचे आवाहन केले होते.

पोलिस दलाच्या आवाहनाला प्रतिसाद देत उपविभाग अहेरी अंतर्गत उपपोस्टे पेरमिली हद्दीतील गट्टेपल्ली, रापल्ले, येरमनार, येरमनार टोला, चंद्रा व कुडकेली गावातील नागरिकांनी स्वतःकडे असलेल्या ८ भरमार बंदुका व १ बॅरल ५ डिसेंबर रोजी पोलिसांच्या स्वाधीन केल्या. नागरिकांनी स्वच्देने बंदुका पोलिसांच्या स्वाधिन केल्यामुळे अपर पोलिस अधीक्षक (अहेरी) यतिश देशमुख यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल ठाकूर यांच्या नेतृत्वात उपपोस्ट पेरमिलीचे प्रभारी अधिकारी धवल देशमुख, पोउपनि सोनवणे, अजिंक्य जाधव, नापोशि केशव गुरनुले, पोशि राहूल खारडे, ब्रिजेश सिडाम, राकेश उरवेते, पंकज दंडिकवार, सुरज परते, यांनी पर्शिम घेतले.

# आता कुंपन शेत नाही खाणार;मालमत्तांचे मिळणार डिजिटल नकाशे

## जिल्ह्यातील ९११ गावांची होणार मोजणी: आतापर्यंत १०० गावांत आटोपली मोजणी



**गोंदिया:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या स्वामित्व योजनेंतर्गत जिल्ह्यातील ९११ गावांची मोजणी उपग्रह व ड्रोनद्वारे सुरु आहे. याद्वारे भूमी अभिलेख कार्यालयाच्या वतीने जलदगतीने काम करुन ८ तालुक्यांची मोजणी सुरु केली आहे. या गावांमध्ये डिजिटल नकाशे तयार करण्याचे काम सध्या सुरु आहे. सद्य: स्थितीत गावांच्या चौकशीचे काम सुरु आहे. यापैकी काही गावांतील मालमत्ता पत्रकांचे कामदेखील पूर्ण झाले आहे. अनेक तालुक्यांची मोजणी अद्याप बाकी आहे. स्वामित्व योजनेंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक गावाचे जीआयएस सर्वेषण सध्या केले जात आहेत. ग्रामविकास विभाग, भूमी अभिलेख विभाग व सर्व्हे ऑफ इंडिया यांच्या समन्वयातून हे काम सध्या सुरु आहे. शेताच्या बांधावरुन होणारी भांडणे आता मिटणार आहेत. यासाठी जमिनीची मोजणी ड्रोनद्वारे केली जात आहे.

### ड्रोनद्वारे मोजणीचे फायदे काय?

नागरिकांच्या मालकीच्या संपत्तीचे ओळखपत्र देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वेक्षण नंतर प्रत्येक गावकऱ्याला नकाशा आणि पीआर कार्ड मिळणार आहे. प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या घराचे, शेत जमिनीचे ई-प्रॉपर्टी कार्ड मिळणार आहे.गोंदिया जिल्ह्यातही आठ तालुक्यात मोजणी प्रक्रिया सुरु आहे. ऑनलाईन पत्रक तयार करण्याचे कामही सुरु असल्याचे विभागातर्फे सांगण्यात आले आहे. लोकांच्या सेवेसाठी भूमी अभिलेख विभागामार्फत झटपट काम करणे सुरु आहे.

### १०० गावांमध्ये चौकशीचे काम पूर्ण

जिल्ह्यात मालमत्ता मोजणी आणि चौकशी प्रक्रिया सुरु आहे. भूमी अभिलेख विभागाचे कर्मचारी गावात जाऊन मालमत्तांची चौकशी करीत असून १०० गावांत चौकशी पूर्ण झाली आहे.



### १०० गावांत ड्रोनने मालमत्तांची मोजणी

गोंदिया जिल्ह्यात आठ तालुके असून साधारण ९११ गावे आहेत. भूमी अभिलेख विभागाकडून ड्रोनद्वारे मालमत्तांची मोजणी प्रक्रिया सुरु झाली आहे. आतापर्यंत १९९ गावांची मोजणी पूर्ण झाली आहे.

### तालुकानिहाय स्थिती काय?

गोंदिया जिल्ह्यातही स्वामित्व योजनेंतर्गत घर आणि जमिनीची ड्रोनद्वारे मोजणी प्रक्रिया सुरु आहे. जिल्ह्यात गोंदिया, आमगाव, सालेकसा, देवरी, अर्जुनी-मोरगाव, सडक-अर्जुनी, गोरेगाव व तिरोडा या तालुक्यातील मोजणी सुरु झाली आहे. तर पावसाळ्यामुळे मोजणी थांबली होती. पावसाळ्यानंतर या तालुक्यांमध्ये मोजणी प्रक्रिया सुरु झाली आहे.

### मालमत्तांचे पत्रक ऑनलाईन मिळणार

भूमी अभिलेख विभागामार्फत ड्रोनद्वारे मालमत्ता मोजणी केली जात आहे. मोजणी झालेल्या गावातील मालमत्तांचे पत्रकही ऑनलाईन तयार केले जाणार आहे. जिल्ह्यात ही प्रक्रिया सुरु आहे. मात्र, अद्याप ऑनलाईन पत्रक तयार झालेले नाही.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# माध्यमांनी संविधानावर आधारित लिखाणाला प्राधान्य द्यावे-रुपेशकुमार राऊत

**गोंदिया :** भारत देश हा जगातील सर्वात सशक्त लोकशाही असलेला देश असून आपली प्रत्येक कृती ही संविधानावर आधारित आहे. खऱ्या अर्थाने संविधानच आपले मार्गदर्शक आहे. प्रत्येक स्पर्धा परीक्षेत संविधानावर आधारित प्रश्न असतातच त्यामुळे माध्यमांनी संविधानावर आधारित वृत्त तसेच लेखमाला लिहून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुण तरुणींना मार्गदर्शन करावे असे आवाहन रुपेशकुमार राऊत यांनी केले.

सामाजिक न्याय विभागामार्फत २६ नोव्हेंबर २०२२, संविधान दिन ते ६ डिसेंबर २०२२, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कालावधीत विविध कार्यक्रम घेऊन समता पर्व आयोजित करण्यात येत आहे. त्यानुषंगाने आज ३० नोव्हेंबर २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, गोंदिया येथे माध्यम कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती त्यावेळी प्रमुख वक्ते ते बोलत होते. उपयुक्त राजेश पांडे कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी होते. सहायक आयुक्त विनोद मोहतुरे व जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



संविधान व माध्यम यावर बोलताना राऊत म्हणाले की, राज्यात व देशात घडणाऱ्या घडामोडींचा लेखाजोखा माध्यमात प्रसिद्ध होत असतो. स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी वृत्तपत्र वाचून तयारी करत असतात. अशावेळी त्या घडामोडींची संविधानाच्या दृष्टिकोनातून कारणमीमांसा करणारे वृत्त व लेख प्रकाशित केल्यास विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त ठरू शकतात. अधिकारी झालेल्या अनेकांच्या यशकथा त्यांनी यावेळी सांगितल्या.

समता पर्वच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी माध्यमांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे राजेश पांडे यांनी सांगितले. समाज कल्याण विभागाच्या विविध लोकोपयोगी योजनांचा लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. समाज कल्याण विभागाने वर्षभरात केलेल्या कामाचा आढावा विनोद मोहतुरे यांनी सादर केला. महा आवास अभियान २०२०-२१ राज्यस्तरीय विशेष पुरस्कार रमाई आवास योजना सर्वोत्कृष्ट जिल्हा द्वितीय क्रमांक पुरस्कार गोंदिया जिल्ह्यास प्राप्त झाला. तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत मौजा अदासी ता. जि. गोंदिया येथे मंजूर व बांधकाम पूर्ण झालेल्या नाथजोगी समाजाच्या वसाहतीकरीता अदासी ग्राम पंचायतीस महा आवास अभियान २०२०-२१ राज्यस्तरीय पुरस्कार राज्य पुरस्कृत आवास योजना सर्वोत्कृष्ट जिल्हा द्वितीय क्रमांक पुरस्कार प्राप्त झाला असल्याचे त्यांनी सांगितले. विभागाच्या योजना गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी माध्यमांचे मोलाचे सहकार्य लाभत असल्याचे त्यांनी सांगितले.

एकाच पर्यटकाला एका भेटीत अनेक पर्यटन स्थळांना भेटी देता याव्यात म्हणून टुरिझम क्लस्टर तयार करण्यात येते त्याच धर्तीवर अधिकाऱ्यांचे गाव ज्या ठिकाणी आहेत त्या गावांना विद्यार्थ्यांना भेट देऊन प्रेरणा मिळाली यासाठी एखादे क्लस्टर शासनाने तयार करावे व यासाठी सामाजिक न्याय विभागाने पुढाकार घ्यावा अशी सूचना माध्यम प्रतिनिधींनी कार्यशाळेत केली.

कार्यक्रमाचे संचालन आशिष जांभुळकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार समाज कल्याण निरीक्षक श्रीमती स्वाती कापसे, यांनी मानले. सदर कार्यक्रमास माध्यम प्रतिनिधी व अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# आदिवासी मागास जिल्ह्याच्या समस्यांकडे शिंदेसरकारचे दुर्लक्ष

**गोंदिया:** राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेला आदिवासी बहुल मागास जिल्हा म्हणून गोंदियाची ओळख आहे. याजिल्ह्याच्या अनेक समस्या उभ्या असून आरोग्याच्या समस्याकडे बघितल्यास सरकारने या जिल्ह्याच्या समस्यांकडेच दुर्लक्ष केल्याची टिका करीत समस्याविरोधात आवाज उठविण्यासाठी मजबूत विरोधी पक्षाची गरज असल्याचे विचार गोंदियातील महाप्रबोधन यात्रेदरम्यान बोलताना सुषमा अंधारे यांनी मांडले.




शिवसेनेच्यावतीने येथील भीमनगर मैदानावर आयोजित महाप्रबोधन यात्रेदरम्यान त्या बोलत होत्या.पुढे बोलतांना सुषमा अंधारे यांनी गेल्या काही महिन्यापुर्वीच आपल्या जिल्ह्यातील एका महिलेवर झालेल्या अत्याचारप्रकरणाला वाचा फोडतांना पोलीस प्रशासन व आरोग्य प्रशासनाने कशापद्धती त्या पिडीती महिलेवरच नव्हे तर कुटुबियांवर सुध्दा अन्याय केल्याचे सांगितले.तर एकीकडे राज्याचे मुख्यमंत्री मी शेतकऱ्याचा मुलगा सांगत असताना आजही जिल्ह्यात धान खरेदी केंद्र सुरु न झाल्याने शेतकऱ्याला आपले धान व्यापारीवर्गाला विकण्याची वेळ आल्याचे सांगत शेतकरी मुलगा म्हणून सांगून काय अर्थ अशापद्धतीने मुख्यमंत्र्यावर टिका केली.

मनसेचे प्रवक्ते प्रकाश महाजनानी केलेल्या टिकेबद्दल बोलतांना महाजनांची भाची पंकजा मुंडेला कशापध्दतीने भाजपने बाहेर टाकले आहे, आधी त्याचा विचार करावा, आपल्या भाचीला ज्या भाजपने कैद करुन टाकले त्याच भाजपसाठी मनसेच्या माध्यमातून पाठराखण करुन काय सिध्द करता असे म्हणत राज ठाकरेंनी आपल्या प्रवक्त्यांची कार्यशाळा घ्यावी असे म्हणाल्या. शेजारील जिल्ह्यातील आमचे नरेंद्रभाऊ यांनी पोलीस अधिक्षकांची बदली फक्त आपल्या वाळू व्यवसायात ते अडसर ठरत असल्यानेच केल्याची टिका करीत उद्या नरेंद्रभाऊच्या भंडारा येथेही मी जाऊन त्यांना बोलणार असल्याचे म्हणाल्या. तर आपल्याला आपले हक्क अधिकार समजून घेण्यासाठी संविधान कळले तरच सविंधानासोबत काय धोके सुरू झालेत हे कळेल. संविधानाने या देशाला दिलेल्या बहुपक्षीय पध्दतीला सध्या भाजप संपवण्याचे काम करीत असल्याचे सांगत विरोधी पक्षच जर राहिला नाही तर हुकूमशाही पध्दती रुजू होऊन देशाचे संविधानच नव्हे तर सर्वसामान्य जनतेचे मोठे नुकसान होणार असल्याचेही त्या म्हणाल्या.

राज्याचे गृहममंत्री देवेंद्र फडणवीस हे गृहमंत्री म्हणून कधी काम करतील असे बोलत राज्यात ज्या पध्दतीने भाजपचे नेते व राज्यपाल महापुरुषांचा अवमान करीत आहेत, त्यावर कारवाई न करता गृहमंत्री गप्प बसून आहेत, यावरुन फडणवीसांचेच तर त्यांना पाठबळ नाही ना ही शंका व्यक्त करायला काय हरकत असे सांगतच रवी राणा व बच्चू कडूंच्या प्रकरणात फडणवीसांची खेळी यशस्वी राहिल्याची टिका केली.

राज्याला महिलामंत्री म्हणून विद्यमान सरकारकडे एकही पात्र महिला आमदार मिळाली नसल्याने महिलांच्या समस्या कोणाकडे मांडणार असा प्रश्न उपस्थित करुन आनंद दिघेंच्या नावावर सुरु केलेल्या आनदांचा शिधा मात्र मिंदेसरकारच्या मंत्र्याच्या फोटोसाठीचा कार्यक्रम ठरल्याचे त्या म्हणाल्या. या महाप्रबोधन यात्रेला निलेश धुमाळ, पंकज यादव, शैलेष जायस्वाल, सुनिल पालांदूरकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# चोपा-गोठणगाव आरोग्य केंद्रात मोबाईल व्हॅनव्दारे संशयित कर्करोग रुग्णांची तपासणी




**गोरेगाव:** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंन्द्र चोपा येथे मोबाईल व्हँनद्वारे संशयित कर्करोग रूग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी आयोजित शिबीर राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पिटल आणि संशोधन केंद्र इंडिया कॅन्सर सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. यामध्ये ८२ लोकांनी तपासणी केली. गोठणगावातील प्राथमिक आरोग्य केन्द्रात १०९ लोकांनी शिबीरात तपासणी केली.

शिबिरात मोबाईल वैद्यकीय पथकात डॉ.प्राजक्ता बांदेबुच, डॉ.अस्मिता वाघमारे, डॉ. मोहुर्ले, स्टाफ नर्स सविता लिहीतकर, वैद्यकिय सामाजिक सेवक विष्णुदास शरणागत, सुरेश रावडा, दुर्गाप्रसाद शरणागत, शालु डोंगरे यांनी वैद्यकिय सेवा दिली. यात स्त्री रोग तज्ञ, कान-नाक-घसा तज्ञ, दंत शल्यचिकित्सक, वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग कर्मचारी यांचे पथक उपस्थित होते राहणार आहे. यात कर्करोग संबधाने अत्यानुधिक प्रयोगशाळा चाचण्या सुद्धा करण्यात आल्या. तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटलतर्पेष्ठ गरीब व गरजू रुग्णांसाठी विशेष उपचार सुविधा उपलब्ध करून दिली गेली. शिबिरात २ लोकांना संशयित तोडांचा कँसर व एका संशयित रुग्णाला विशेष तपासणीसाठी नागपुर येथे संदर्भीत करण्यात आले.

शिबीराप्रसंगी तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ. विनोद चव्हाण, चोपाचे वैद्यकिय अधिकारी डॉ.कुलदिप बघेले,तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ. विजय राऊत, वैद्यकिय अधिकारी डॉ. खोब्रागडे, डॉ. स्नेहा वंजारी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, सामुदायिक आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, फार्मासिस्ट, आरोग्य सहाय्यक , परिचर उपस्थित होते.

कडोजी कॅन्सर रुग्णालय आणि संशोधन केंद्र इंडिया कॅन्सर सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात कॅन्सर स्क्रीनिंग कार्यक्रम राबवल्या जाणार आहे. क्लिनिंग कार्यक्रम तसेच राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पिटलमध्ये उपलब्ध उपचार सुविधांचा गरजूंनी लाभ घेण्याचे आव्हान यांनी केले आहे.

## मॉडेल कॉन्व्हेंट एण्ड सायन्स ज्यू. कॉलेज गोरेगांव मधील विद्यार्थ्यांची बॅडमिंटन स्पर्धेत जिल्हास्तरावर निवड

**गोरेगाव :-** स्थानीय मॉडेल कॉन्व्हेंट एण्ड सायन्स ज्यू. कॉलेज गोरेगांव मधील विद्यार्थ्यांनी तालुका स्तरावर आयोजित बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम प्रथम क्रमांक पटकावून आपली निवड जिल्हास्तरावर केली आहे. विजयी झाल्याबद्दल शाळेचे संस्थापक श्री आर. डी. कटरे, प्रशासकीय अधिकारी श्री सी. बी. पटले, प्राचार्या सौ. सी. पी. मेश्राम, पर्यवेक्षक एस. डी. चीचामे, यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केले. तसेच सर्व शिक्षकांनी विजयी विद्यार्थी तसेच क्रीडा शिक्षक श्री आशीष रामटेके यांचे अभिनंदन करून कौतुक केले. वैष्णवी मडावी, तनुश्री हनवते,



तृप्ती दानी, आलिशा रहांगडाले, प्रशिका रामटेके यांनी आपल्या यशाचे श्रेय क्रीडा शिक्षक, शाळा संस्थापक, प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, सर्व शिक्षक वृंद व शाळेला दिले..

# आमदारांच्य कार्यालयावर धडकणार अंगणवाडी सेविका

**गोंदिया:** अंगणवाडी सेविकांना कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा, यासह अन्य मागण्यांसाठी अंगणवाडी सेविका व मदतनीस १० ते १७ डिसेंबर या कालावधीत जिल्ह्यातील आमदारांच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढणार आहे. कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा, दर्जा मिळेपर्यंत सेविका व मिनी अंगणवाडी सेविका यांना २१ हजार रुपये तर मदतनीस यांना १८ हजार मानधन देण्यात यावे, १० हजार रुपये पेंशन लागू करण्यात यावी, अंगणवाडी सेविकांना मेडीकल लाभ देण्यात यावा, सेविका व मदतनिसांची रिक्त पदे ताबडतोब भरण्यात यावीत, जीर्ण अंगणवाड्या नव्याने बांधून घाव्यात, अमृत आहाराचे प्रत्येक महिन्यात बिल देण्यात यावे आदी मागण्यांसाठी अंगणवाडी सेविका व मदतनीस हा मोर्चा काढणार आहेत.



१० डिसेंबर रोजी आमदार विजय रहांगडाले, १२ डिसेंबर रोजी आमदार सहषराम कोरोटे, १४ डिसेंबर रोजी अर्जुनी मोरगावचे आमदार मनोहर चंद्रीकापुरे व १७ डिसेंबर रोजी आमदार विनोद अग्रवाल यांच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व महाराष्ट्र राज्य अंगणवाडी बालवाडी कर्मचारी युनियनचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले, जिल्हाध्यक्ष शकुंतला फटींग, सचिव पोर्णिमा चुटे, कोषाध्यक्ष जीवनकला वैद्य, गोंदिया शहर सचिव विठा पवार करणार आहेत. मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आम्रकला डोंगरे, विणा गौतम, राजलक्ष्मी हरिणखेडे यांनी केले आहे.

## कृषीमंत्री अब्दुल सत्तार ८ डिसेंबरला जिल्हा दौऱ्यावर

**गोंदिया:** राज्याचे कृषी मंत्री अब्दुल सत्तार हे गुरुवार ८ डिसेंबर २०२२ रोजी गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून ११ वाजता कामठा ता. जि. गोंदिया येथे आगमन व संत श्री. लहरीबाबा आश्रय संस्थान येथे आयोजित श्री. संत लहरीबाबा जन्मशताब्दी महोत्सवास उपस्थिती. दुपारी १२ वाजता कामठा येथे लहरी सभागृह व कार्यालय इमारत तथा कृषी प्रदर्शन उद्घाटन कार्यक्रमास **उपस्थिती**

## समता पर्व निमित्ताने लाभार्थ्यांना विविध लाभाचे वाटप

**गोंदिया:**सामाजिक न्याय विभागामार्फत २६ नोव्हेंबर २०२२, संविधान दिन ते ६ डिसेंबर २०२२, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कालावधीत विविध कार्यक्रम घेऊन समता पर्व आयोजित करण्यात आले. त्यानुषंगाने ५ डिसेंबर २०२२ रोजी संविधान जागर व येणाऱ्या ६ डिसेंबर महापरिनिर्वान दिनाच्या संदर्भात अभिवादनात्मक कार्यक्रमाचे आयोजन तसेच सामाजिक न्याय विभागाच्या लाभार्थ्यांना विविध लाभाचे वाटप, बक्षिस/पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती राजेश पांडे हे होते. प्रास्ताविक विनोद मोहतुरे यांनी केले

# आगामी ग्रामपंचायत निवडणुकीचे मानधन कर्तव्यस्थळीच द्या

**अर्जुनी मोरगाव:** ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक सन २००७, २०१२, २०१७ चे निवडणूक कर्तव्य पार पाडणाऱ्या शिक्षकांचे प्रलंबित मानधन मिळावे व आगामी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीचे मानधन कर्तव्यस्थळी देण्याची मागणी कैलास हांडगे व इतर शिक्षकांनी निवेदनाद्वारे स्थानिक प्रशासनास केली आहे.



अर्जुनी मोरगाव तालुक्यात निवडणूक मानधन संदर्भाने वेळोवेळी शिक्षकांवर अन्याय झाला आहे. या अन्यायाची पुनरावृत्ती यापुढे होऊ नये व आगामी होऊ घातलेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीचे मानधन कर्तव्यस्थळी देण्याची मागणी निवेदनाद्वारे तहसीलदार अजुनी मोरगाव तथा निवडणूक निर्णय अधिकारी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२२ यांच्याकडे करण्यात आला. ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक सन २००७, २०१२, २०१७ व जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२१-२२ च्या दुसऱ्या टप्प्याचे मानधन अजूनपर्यंत प्रलंबित आहे. याची पुनरावृत्ती आगामी ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये होत असेल तर आम्हाला या कामातून वगळण्यात यावे व याकरीता इतर विभागातील कर्मचाऱ्यांना सहभागी करून घ्यावे असे निवेदनाद्वारे कळविण्यात आले.

यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने सर्वश्री राजेश साखरे, कैलास हांडगे, राजेश मरघडे, गजानन रामटेके, जगदीश मेश्राम, पुंडलिक वकेकर, भागवत सोनवणे, हेमराज समरीत, सुरेश ब्राह्मणकर व इतरही शिक्षक हजर होते.

# ध्येय निश्चिती शिवाय यश अशक्य-उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे

**गोंदिया:** पोलीस विभाग गोंदिया व अदानी फाउंडेशन तिरोडाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रमातील बारा प्रशिक्षणार्थींची सैन्य, नेव्ही, एमएसएफ, बीएसएफ ,सीआयएसएफ, रेल्वे पोलीस सारख्या विविध विभागांमध्ये निवड झाली आहे. त्या प्रशिक्षणार्थींचा सत्कार समारोह अदानी पावर महाराष्ट्र लिमिटेड तिरोडा येथे नुकताच पार पडला. यावेळी प्रामुख्याने उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे, तिरोडा येथील अदानी पाँवर प्लांट प्रमुख कांती बीश्वास, ऑपरेशन अँड मेंटेनन्स हेड संजय रांगणेकर, सुरक्षा विभाग प्रमुख राजेंद्र मुरइ व अदानी फाउंडेशन प्रमुख बिमुल पटेल उपस्थित होते.



यावेळी उपस्थित प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे यांनी युवकांनी ध्येय निश्चिती करून ते ध्येय पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम केल्यास यश नक्की मिळते असे विचार व्यक्त केले. तसेच जे यशस्वी विद्यार्थी आहेत त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन इतर प्रशिक्षणार्थींनी सुद्धा यश संपादन करावे. अदानी फाऊंडेशनच्या या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ युवक-युवतींनी घ्यावा असे आवाहन केले. तसेच ऑपरेशन अँड मेन्टेनन्स हेड संजय रांगणेकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच सुरक्षा विभाग प्रमुख राजेंद्र मुरइ यांनी यश प्राप्तीसाठी शिस्तबद्ध प्रयत्न तसेच ज्या परीक्षेचे आपण तयारी करत आहोत त्याचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे असे सांगितले.

प्रास्ताविकातून बीमुल पटेल यांनी आजच्या सत्कार समारंभाचे आयोजन यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी व इतर विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी यासाठी करण्यात आले आहे असे सांगितले. याप्रसंगी जयश्री भगत, संतोष पटले, संदीप टेंभरे, दिव्या बिंजाडे, उद्देश गौतम, निलेश लिल्हारे, जितेंद्र भगत, कृष्णकुमार गमे, विशाल ठाकरे, महेंद्र मुटकुरे, संतोष टेंभरे, अंकुश टेंभरे, आशिष पारधी, गौरव रिद्धनथी, नेहा पारधी या यशस्वी युवक-युवतींचा सत्कार करुन त्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल शेजव व आभार प्रदर्शन स्वप्निल वाहने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशिक्षक सचिन बिसेन व जतिन येळे यांनी तसेच अदानी फाउंडेशनच्या सर्व टीमने परिश्रम घेतले.

# ५० महिला शेतकऱ्यांनी बारामती येथे घेतले मुरघास निर्मितीचे धडे

## अदानी फाऊंडेशनचा उपक्रम: जनावरांना होणार हिरव्या चाऱ्याची उपलब्धता

**तिरोडा:** तालुक्यातील घोटी (मंगेझरी) येथील महिला शेतकऱ्यांकरिता ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती (पुणे) येथे मुरघास निर्मितीविषयी दोनदिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अदानी फाऊंडेशनच्या पुढाकाराने सामूहिक शेती प्रकल्पांतर्गत करण्यात आले होते.



या प्रकल्पांतर्गत घोटी येथील शेतकऱ्यांच्या शेतातील भातपीक निघाल्यानंतर रब्बी हंगामात मका व ज्वारी लागवड करुन त्यापासून मुरघासनिर्मिती करावयाचे नियोजन आहे.जेणेकरुन आपल्या सभोवताली परिसरात उन्हाळी हंगामामध्ये जनावरांना हिरव्या चाऱ्याची उपलब्धता व्हावी, हवाविरहित अवस्थेमध्ये जगणाऱ्या सुक्ष्म जिवाणुंमुळे हिरव्या चाऱ्याच्या वैरणीत असलेल्या साखरेपासून लॅक्टिक आम्ल तयार होते. हे आम्ल चारा चांगल्या अवस्थेमध्ये ठेवण्याचे काम करते. उन्हाळी हंगामामध्ये आपल्या परिसरात आपण हे मुरघास जर जनावरांना दिले तर नक्कीच दुग्धोत्पादनात वाढ होईल. तसेच मुरघासनिर्मिती करणाऱ्या शेतकऱ्याने हे जर विक्री केले तर नक्कीच त्याच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. या उद्देश्यपुर्तीकरिता मंगेझरी सरपंच संतोष ठाकरे यांच्यासह एकुण ५८ महिला-पुरुष शेतकऱ्यांची ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती, पुणे येथे दोन दिवसीय प्रशिक्षण व शैक्षणिक सहल अदानी फाऊंडेशन तिरोडातर्फे नेण्यात आली.

### प्रथमच होणार मुरघास लागवड

आपल्या भागात पहिल्यांदा मुरघासनिर्मिती करुन हे शेतकरी निश्चितच इतर शेतकऱ्यांसाठी आदर्श ठरतील. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अदानी फाऊंडेशन प्रमुख बिमुल पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली अदानी फाऊंडेशनचे वरिष्ठ प्रकल्प अधिकारी कैलास रेवतकर यांनी सहकार्य केले.

### मुरघास पशुपालकांकरिता वरदान

या प्रशिक्षणाला प्रशिक्षक म्हणून कृषी विज्ञान केंद्र बारामतीचे डॉ. रतन जाधव (विषयतज्ज्ञ) यांनी मक्का व ज्वारी लागवड कशी करावी, या पिकांपासून मुरघासनिर्मिती तसेच मुरघासनिर्मितीकरिता इतर पिकांची निवड, मुरघासचे एकुण फायदे, मुरघास पशुपालकांकरिता कसे वरदान अहे. आवश्यकतेनुसार मुरघासनिर्मिती व त्याची साठवणूक याचे नियोजन, मुरघासाची प्रत ओळखणे आणि मुरघास तयार करण्याचे नवीन तंत्रज्ञान यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

### मका व मुरघासची लागवड करणार

क्षेत्र भेटीदरम्यान मका लागवड करुन त्यापासून मुरघासनिर्मिती करणारे शेतकरी विष्णू गोमणे यांच्या शेतात भेट देऊन मका पिकांपासून मुरघासनिर्मिती प्रत्यक्ष पाहण्यात आली. तसेच त्यांच्याकडून याविषयी संपूर्ण माहिती घेण्यात आली. या भेटीनंतर घोटी येथील एकुण ५० आदिवासी महिला शेतकऱ्यांनी मका व ज्वारी लागवड करुन त्यापासून मुरघासनिर्मिती करावयाचा ठाम निश्चय केला.

## शेतजमिनीच्या वादात पुतण्याने केला काकाचा खून

**साकोली:-** शेतजमिनीच्या वादावरून पुतण्याने काकाला केलेल्या मारहाणीत काकाचा रविवारी (ता.४) उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी साकोली पोलिसांनी आरोपी आनंद नागेश्वर वासनिक (३४) रा. सालई याच्याविरोधात कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली आहे. मृतकाचे नाव कैलाश श्रीराम वासनिक (५०) रा. सालई आहे.

साकोली तालुक्यातील सालई येथील कैलास श्रीराम वासनिक व आनंद नागेश्वर वासनिक यांची घराजवळ एक एकर शेती आहे. काका कैलासची अर्धा एकर शेती पुतण्या आनंदने ठेक्याने घेतली होती. ठेक्याची तीन हजार रुपयाची रक्कम आनंदने काका कैलासला दिली होती. काहीही देणे घेणे व्यवहारात बाकी नव्हते. मात्र काका कैलास वारंवार आनंदला माझी शेती यापुढे करायची नाही व व्यवहार झाल्यानंतरही वादविवाद घालून शिवीगाळ करायचा. आनंदला काका कैलासने शिवीगाळ केली व शेती करण्यावरुन वाद घातला. या वादामध्ये काका कैलासने हातात काठी घेऊन आनंदला मारहाण केली. तिच काठी आनंदने हिसकून प्रतिकार करीत काकाला झोडपले. यामध्ये काका कैलासच्या डोक्यावर जबर मार लागला. जखमी अवस्थेत काकाला घेऊन दवाखान्यात उपचार करण्यात आले. कैलासच्या डोक्यावर जबर मार असल्याने त्याचा मृत्यू झाला.

# तात्काळ विजजोडणी,पारदर्शक गतिमान सेवा, तसेच वीज चोरी, वीज गळतीला आळा घालण्यावर राहणार भर-पुष्पा चव्हाण

**गोदिंया:** महावितरण गोंदिया परिमंडलाच्या नव्या मुख्य अभियंता श्रीमती पुष्पा राम चव्हाण यांनी आपलया पदाचा मुख्य अभियंताम हणुन आज स्वीकारला. ऊर्जा हे विकासाचे मुळ स्त्रोत असल्याने परिमंडलाअंतर्गत असलेल्या समाजाच्या शेवटच्या घटकांना गतीमान सेवा व ऊर्जेव्दारे विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे, वीज चोरी, वीज गळतीला आळा घालणे, अखंडित, पारदर्शक आणि गतीमान सेवा देण्यावर भर राहणार असल्याचे मत पुष्पा चव्हाण यांनी व्यक्त केले. तसेच ग्राहकांनी वापरलेल्या विजेचे बिल वेळेत भरणे तेवढेच गरजेचे असल्याचेही मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.



पुष्पा चव्हाण यांनी महावितरणच्या पहिल्या, महिला मुख्य अभियंता म्हणून मुख्य अभियंता(वितरण)या पदावर २०१५ साली नियुक्ती झाली. त्यानंतर मुख्य अभियंता (एकात्मिक ऊर्जा विकास योजना), मुख्य अभियंता भांडूप परिमंडलाची व अमरावती परिमंडळा ची जबाबदारी अत्यंत कुशलतेने आणि यशस्वीरित्या पार पाडली. भांडुप परिमंडळात मुख्य अभियंतापदी कार्यरत असताना , जागतिक वारसा लाभलेल्या घारापुरी बेटास समुद्राच्या तळाशी १.२ मिटर खालून ७ किमी लांबीची २२ केव्हीची ऊच्चदाब केबल टाकून वीज पुरवठा करण्यात आला. या कामाची जबाबदारी मुख्य अभियंता श्रीमती पुष्पा चव्हाण यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. घारापुरी बेट प्रकाशमान झाल्याची नोंद मा.ना.पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी दोन वेळा मन की बात मध्ये घेतली होती. तसेच जुन २०२० मध्ये आलेल्या निसर्गफ चक्रीवादळात महावितरणच्या विज वाहिन्या जमीनदोस्त झाल्या असतांना , अत्यंत कमी कालावधीत नियोजनबध्द पध्दतीने सर्व यंत्रणा पुर्ववत करण्याची महत्वाची आणि कठिण जबाबदारी त्यांच्या नेतृत्वात यशस्वीपणे पार पडली .

त्यांच्या विविध कार्याची दखल घेत महावितरण मुख्य कार्यालयांकडून त्यांची प्रकाशगड येथे मुख्य अभियंता (सौर प्रकल्प), त्यानंतर मुख्य अभियंता (कृषी धोरण )या पदाची जबाबदारी सोपविण्यात आली .याच काळात शेतकऱ्यांना वीजबिलाच्या थकबाकीतून कायमचे मुक्त करणारे 'कृषी वीज जोडणी धोरण २०२० अस्तित्वात येऊन धोरणाची अंमलबजावणीसाठी कृषी पर्व' राबविण्यात आले.

तत्कालीन एमएसईबी आणि आता महावितरणसारख्या महत्वाच्या आणि राज्यव्यापी वीज कंपनीमध्ये काम करतांना पुष्पा चव्हाण यांनी एक स्त्री म्हणून कुठेही मर्यादा पडू न देता कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता अशा विविध पदाच्या जबाबदाऱ्या धडाडीने आणि खंबीरपणे पार पाडल्या आहे. १९८९ मध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर रूजू झालेल्या पुष्पा चव्हाण यांच्या पाठीशी ३२ वर्षाच्या कामाचा प्रदिर्घ अनुभव आहे. प्रत्येकाची कामाप्रती असलेली प्रामाणिकता, चिकाटी आणि कामात सातत्य असल्यास यश हे निश्चित असल्याचे मत पदभार स्वीकारतांना त्यांनी व्यक्त केले.

# ३४८ ग्रापं निवडणुकीकरिता ७९८६ उमेदवारी अर्ज



**गोंदिया:** जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ३४८ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका होऊ घातलेल्या आहेत. यातंर्गत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी २ डिसेंबर रोजी सरपंच व सदस्यपदासाठी तब्बल ७९८६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. यात सदस्यपदासाठी ७६२३ व सरपंचपदासाठी १२६३ अर्ज प्राप्त झाले आहे. ७ डिसेंबर रोजी निवडणूक अर्ज मागे घेतले जाणार असून त्यानंतरच निवडणुकीतील रिंगणात उमेदवारांची नावे व चिन्हे जाहीर होणार आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील ३४८ ग्रामपंचायतीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास २८ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली.सुरुवातीची दोन दिवस उमेदवारांची गदी दिसली नसली तरी दिसऱ्या व उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी तहसील कार्यालयात इच्छूक उमेदवारांची व त्यांच्या समर्थकांची मोठी गर्दी उसळली. शेवटच्या दिवशी ३४८ ग्राम पंचायतीच्या १०८९ वॉर्डाकरिता सरपंच व सदस्यपदासाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी एकूण ७ हजार ९८६ अर्ज प्राप्त झाले. यात सदस्यपदासाठी ६ हजार ७२३ व सरपंचपदासाठी १ हजार २६३ उमेदवारी अर्ज दाखल झाले. यात

### तालुकानिहाय उमेदवारी अर्ज

| तालुका | ग्रापं | मतदान केंद्र | वॉर्ड | सदस्यपद | सरपंचपद |
|---|---|---|---|---|---|
| गोंदिया | ७१ | २७२ | २३३ | १६४३ | २६८ |
| तिरोडा | ७४ | २२७ | २२७ | १४२६ | २५७ |
| गोरेगाव | ३० | ९६ | ९३ | ५५८ | ९७ |
| अ.मोर. | ४० | १२३ | १२३ | ७६९ | १७५ |
| सडक अ. | ४३ | १३९ | १३७ | ७११ | १५२ |
| देवरी | २५ | ७५ | ७५ | ४०१ | ९७ |
| आमगाव | ३४ | १०२ | १०२ | ६६६ | ११४ |
| सालेकसा | ३१ | ९७ | ९७ | ५४९ | १०३ |
| एकूण | ३४८ | ११३१ | १०८९ | ६७२३ | १२६३ |

सर्वाधिक अर्ज गोंदिया तालुक्यात १९११ तर सर्वात कमी ४९८ अर्ज देवरी तालुक्यात प्राप्त झाले.

इच्छूक उमेदवारांची संख्या मोठी असली तरी अर्ज छाणणी झाल्यानंतर ७ डिसेंबर सें रोजी ३ वाजतापर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतरच निवडणुकीतील रिंगणात कोणता उमेदवार "इन' राहतो व कोण "आऊट'होतो, याकडे सर्वांचेच लक्ष राहणार आहे. विशेष म्हणजे, एकीकडे उमेदवारी अर्ज दाखल करताना ऑनलाईनचा खोडा निर्माण झाल्यानंतर ऑफ लाईनचा पर्याय देण्यात आला. मात्र अर्ज दाखल करताना संबंधित कर्मचाऱ्यांची चांगलीच दमझाक झाली.

तर अचूक अर्ज भरण्यासाठी समर्थित राजकीय पक्ष व त्यांच्या उमेदारांनाही मोठी धापवळ करावी लागल्याचे चित्र उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी पहायला मिळाले. आता ७ डिसेंबर सें रोजी रिंगणातील उमेदवार व त्यांचे ओळखचिन्हे जाहीर होणार असल्याने त्यानंतरच रणधुमाळीची खरी रंगत रंगणार आहे.

# नागपुर–बिलासपूरदरम्यान धावणार वंदे भारत

**गोंदिया:** दक्षिण पूर्व मध्य रेल्वे झोनला एक वंदे भारत ट्रेन मिळाली आहे. या गाडीचा रुटसुद्धा निश्चित झाला आहे. ही गाडी नागपूर ते बिलासपूरदरम्यान धावणार आहे. याला रेल्वे बोर्डाची मंजूरी मिळाली आहे. या गाडीचे वेळापत्रकही तयार झाले असून ते सध्या सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे.

वंदे भारत ट्रेस सुरु करण्यासाठी रेल्वेच्या झोन अधिकाऱ्यांनी या मार्गाचे निरीक्षण सुरु केले आहे. केवळ आता गाडी सुरु करण्याचा दिवस निश्चित व्हायचा आहे. गुरुवारी (दि.१) परिचालन, मॅकेनिकल, विद्युत व कर्मशियल विभागाच्या अधिकाऱ्यांनी येथील कोच डेपोचे निरीक्षण करुन आढावा घेतल्याची माहिती आहे. या गाडीच्या देखभाल दुरुस्तीसाठी बिलासपूर व गोंदिया येथे यासाठी विशेष डेपो तयार करण्याचे काम सुरु आहे.



### गाडीचा वेग प्रतितास १३० किमी

**वंदे भारत रेल्वे गाडीची गती क्षमता प्रतितास १३० किमी आहे. नागपूर ये दुर्गपर्यंत या क्षमतेला रेल्वेच्या सेफ्टी कमिश्नरची हिरवी झेंडी मिळाली असल्याची माहिती आहे. तर उर्वरित रेल्वे स्थानकादरम्यान सेफ्टी कमिश्नरची हिरवी झेंडी मिळाल्यानंतर गाडी धावणार आहे.**

वंदे भारत ट्रेनची प्रवासी क्षमता ११२८ असून ही गाडी देशातच तयार करण्यात आली आहे. या गडीची बैठक व्यवस्था अत्यंत आरामयदायक आहे. या गाडीचे बिलासपूर, रायपूर, दुर्ग, गोंदिया, नागपूर येथे थांबे असणार आहे. मात्र ही गाडी नेमकी कोणत्या तारखेपासून धावणार हे अद्याप स्पष्ट झाले नसल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### ट्रेनचे डब्बे दिल्ली येथे तयार

**वंदे भारत रेल्वे गाडीचे डब्बे दिल्ली येथे तयार करण्यात आले आहेत. हे डब्बे आणण्यासाठी लवकरच रेल्वेची टीम रवाना होणार असल्याची माहिती आहे. जीपीएस प्रणालीच्या आधारावर वंदे भारत गाडीचे संचालन होणार आहे. आता ही गाडी लवकरच सुरुच होणार असल्याने प्रवाशांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.**

### सोशल मिडीयावर वेळापत्रक झाले व्हायरल

**सध्या सोशल मिडीयावर व्हायरल होत असलेल्या वेळापत्रकानुसार बिलासपूर रेल्वेस्थनकावरुन ही गाडी सकाळी ६.४५ वाजता सुटेल, रायपूर सकाळी ८.०६, दुर्ग ८.४७ वाजता पोहोचेल, तर गोंदिया स्थानकावर सकाळी १०.३० वाजता पोहोचेल, १०.३२ वाजता गोंदियावरुन नागपूरकडे रवाना होईल व नागपूर येथे दुपारी १२.१५ वाजता पोहोचेल. तर नागपूरवरुन ही गाडी बिलासपूरसाठी १४.०५ वाजता रवाना होईल.**

# हलबीटोलासींची जीव धोक्यात घालून वाहतूक



**गोरेगाव:** हलबीटोला ते गोरेगाव हा रस्ता पूर्ववत होता. मात्र रेल्वे प्रशासनाने हा रस्ता बंद केला आहे. त्यामुळे येथील नागरिकांना हिरडामाली रेल्वेस्टेशनवर व गोरेगावला येण्यासाठी पक्का रस्ता नाही. हा रस्त्याचे नव्याने पक्के बांधकाम करण्यात यावे. रेल्वे रूयावर भुयारी पूल बांधण्यात यावा, अशी मागणी माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार यांनी खासदार सुनील मेंढे, रेल्वे विभागीय व्यवस्थापक यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

हलबीटोला येथील नागरिकांना गोरेगाव, हिरडामाली रेल्वे स्टेशनवर येण्या–जाण्यासाठी रस्ता होता. त्यामुळे नागरिक सुलभतेने आवागमन करीत होते. पण रेल्वे प्रशासनाने हा रस्ता बंद केल्याने या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुचकी, पादचारी या बंद रस्त्यावरुन आवागमन करीत रेल्वे रुळ ओलांडून हिरडामाली रेल्वे स्टेशनवर ये–जा करीत आहेत. यामुळे एखाद्या वेळेस अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिवाय येथील गावकरी हे रेल्वे रुळावरुन वाहतूक करीत असल्याने त्यांच्या जिवाला धोका आहे. त्यामुळे ही गंभीर बाब लक्षात घेता रेल्वे विभगाने येथे पक्क्या रस्त्याचे बांधकाम आणि भुयारी पूल तयार करण्याची मागणी माजी नगराध्यक्ष आशिष बारेवार यांनी खासदार सुनील मेंढे, रेल्वे विभागीय व्यवस्थापक नागपूर यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# तहसीलदारांच्या निवासस्थानाला आले गायींच्या गोठ्याचे स्वरूप

## इमारत झाली जीर्ण: देखभाल दुरुस्तीकडे कुणाचेच लक्ष नाही



**सालेकसा:** येथील तहसील कार्यालय परिसरात असलेला तहसीलदार निवास आता वास्व्य करणे योग्य राहिलेले नाही. निवासाची दुरावस्था झाली असून परिसरात काडीकचरा पसरलेला आहे. त्यामुळे तहसीलदारांच्या निवासस्थानाला गोठ्याचे स्वरुप आल्याचे चित्र आहे. मात्र त्याची अद्यापही दुरुस्ती करण्यात आली नसल्याने तहसीलदार निवासस्थानाची बिकट अवस्था झाली आहे.

१९८२ मध्ये तत्कालीन भंडारा जिल्ह्यातील गोंदिया तालुक्याचे विभाजन करुन इतर तालुक्याप्रमाणे सालेकसा तालुक्याची निर्मिती करण्यात आली. काही वर्षानी तहसील कार्यालयाची इमारत आणि तहसीलदार निवास व इतर कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी इमारत तयार करण्यात आली. तेव्हापासून या ठिकाणी रुजू होणारे तहसीलदार या ठिकाणी राहून आपले कर्तव्य पार पाडत होते.

इमारत जसजशी जुनी होत गेली तसतशी तिची दुरुस्ती व डागडुजी करुन प्रत्येक तहसीलदाराने त्याच इमारतीत राहून तहसील कार्यालयाच्या कामकाजात प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यास महत्व दिले. परंतु विद्यमान तहसीलदार या इमारतीमध्ये राहत नसून तालुका मुख्यालयी इतर ठिकाणी सुद्धा न ाहता १६ किलोमीटर अंतरावर असलेल्या आमगाव येथून अप–डाऊन करीत असल्याची माहिती आहे. तर दुसरीकडे रिकामे तहसीलदार निवास आता मोकाट जनावरांचे आश्रयस्थान झाले आहे. पण या इमारतीची अद्यापही दुरुस्ती करण्यात आली नाही.

# ४ हजार दिव्यांगांना मिळाला शिक्षणाचा आधार

## दिव्यांग समावेशित विभागाची धडपड

**गोंदिया:** कसलाही न्युनगंड न बाळगता दिव्यांग मुला–मुलींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्यातच २००३–०४ पासून सर्व शिक्षा अभियानांतर्गत अपंग समावेशित यंत्रणेच्या माध्यमातून दिव्यांग मुला–मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले जात आहेत. या माध्यमातून गोंदिया जिल्ह्यातील ३ हजार ९०४ दिव्यांगांना विकासाच्या मुख्य प्रवाहात जुडवण्यासाठी आधार मिळाला आहे. एवढेच नव्हेतर अपंग समावेशित विभागाकडून विविध प्रवर्गात मोडणाऱ्या दिव्यांगांवर शस्त्रक्रिया, उपचार, वैयक्तिक देखरेख आणि त्यांच्या कुटुंबांना योग्य मार्गदर्शन देण्याचे कामही सातत्याने होत आहे.




गोंदिया जिल्ह्यात सर्व प्रवर्गाचे जवळपास ३ हजार ९०४ दिव्यांग आहेत. यामध्ये अर्जुनी मोरगाव तालुक्यात ४५१, आमगाव ४०१, देवरी ४७७, गोंदिया ८७९, गोरेगाव ३०४, सडक अर्जुनी ५५१, सालेकसा ३००, तिरोडा तालुक्यातील ५५१ दिव्यांगांचा समावेश आहे. या दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात जोडण्यासाठी २००३–०४ पासून अपंग समावेशित यंत्रणा कार्यरत आहेत. जवळपास ४७ विशेष शिक्षक, २ विभाग प्रमुखांच्या माध्यमातून जिल्ह्यातील दिव्यांग मुला–मुलींना शिक्षणापासून त्यांच्या देखभाल व त्यांच्या कुटुंबाला मार्गदर्शनाचे काम केले जात आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून जिल्ह्यातील दिव्यांग मुला–मुलींना समाजाच्या मुख्य प्रवाहात जुडण्याचा आधार मिळाला आहे.

**तटपुंजे मानधनात यंत्रणेची सेवा**

गेल्या २० वर्षांपासून सर्व शिक्षा किंबहुना समावेशित शिक्षा विभागांतर्गत अपंग समावेशित विभाग काम करीत आहेत. जिल्ह्यात अपंग समावेशित विभागात २ विभाग प्रमुख, ४७ विशेष शिक्षक अत्यंत तुटपुंज्या मानधनात सेवा पुरवित आहेत. एवढेच नव्हेतर दैनंदिन घडामोडीत येणाऱ्या सर्व वैयक्तिक अडचणीला तोंड देत सेवा देत असल्याने आजघडीला गोंदिया जिल्ह्यातील दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणण्याचा आधार मिळाला आहे. उल्लेखनीय असे की, गेल्या २० वर्षांपासून विभाग प्रमुखाचे कामकाज सांभाळणारा व्यक्तिमत्व स्वत: कर्करोगाने आजारी आहे. या आजारावर मात करीत सेवा देत आहे, हे विशेष.

**२५०० दिव्यांगांना गृहभेट**

अपंग समावेशित यंत्रणेकडून सातत्याने दिव्यांगांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी धडपड सुरू आहे. चालू आर्थिक वर्षात यंत्रणेकडून ४४९१ दिव्यांगांना प्रत्यक्ष भेट देण्यात आली आहे. तर ३८०० दिव्यांगांच्या पालकांना भ्रमणध्वनीवरून संपर्क करून सतत मार्गदर्शन केले जात आहे. त्याचप्रमाणे २५०९ दिव्यांगांना गृहभेट देण्यात आली आहे.

# ग्रामपंचायत निवडणूक निरीक्षक म्हणून राजेश खवले यांची नियुक्ती

**गोंदिया:** माहे ऑक्टोंबर, २०२२ ते डिसेंबर,२०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रापंचायती, नव्याने स्थापीत तसेच समर्पित आयोगाच्या अहवालात दिसत नसल्यामुळे मागील निवडणूकांमधून वगळलेल्या ग्रामपंचयतीच्या (सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या) सार्वत्रिक निवडणूकांसाठी संगणकप्रणालीव्दारे राबविण्याचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहिर झालेला आहे. सदरहू निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून अपर जिल्हाधिकारी, गोंदिया राजेश खवले यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणूका संदर्भातील मतदार, नागरीकांच्या काही तक्रारी असल्यास, त्यांनी त्याबाबतच्या तक्रारी, निवडणूक निरीक्षक यांच्याकडे सादर करावी. असे आवाहन निवडणूक निरीक्षक, राजेश खवले, अपर जिल्हाधिकारी यांनी केलेले आहे.



# ओबीसी वसतिगृहांसाठी जागेची अडचण भ्रष्टाचारातून

**वर्धा:** ओबीसी वसतिगृहांसाठी सरकारला जागा मिळत नसल्याने ती अशासकीय संस्थांना चालवायला देण्यात आली. अपर मुख्य सचिव नंद कुमार यांनी शासन निर्णय काढताना तसे नमूद केले. संस्थांना कोट्यावधीचा लाभ मिळवून देण्यासाठी खेळलेली ही खेळी आहे. या भ्रष्टाचाराची चौकशी करुन नंदकुमार यांची ओबीसी विभागातून हकालपट्टी करावी. खासगी संस्थांना वसतिगृहे देण्याचा निर्णय त्वरित रद्द करावा, असा सूर महात्मा फुले समता परिषदेच्या बैठकीत व्यक्त झाला. ओबीसी वसतिगृहांसाठी ३२ जिल्ह्यांत जागा मिळेना! हे वृत्त प्रकाशित केल्यानंतर सरकारच्या धोरणाविरुद्ध संताप व्यक्त होऊ लागला आहे,



नागपुरातील गणेशपेठ परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात विदर्भातील अकराही जिल्ह्यांतील महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष, महिला अध्यक्ष, पदाधिकारी, ओबीसी संघटना व विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी यांची बैठक रविवारी झाली. व्यासपीठावर महात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष प्रा. दिवाकर गमे, राष्ट्रवादीचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष ईश्वर बाळबुद्धे, समता परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रा.अरविंद गभने यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.गमे म्हणाले, राज्य सरकारने ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ७२ वसतिगृहांची घोषणा केली.

अशासकीय संस्था हे वसतिगृह चलविणार आहेत. यासाठी केंद्र सरकार ६० टक्के निधी देणार आहे. पण केंद्र सरकारने ओबीसींसाठी अर्थसंकल्पात कुठलीही तरतूद केलेली नाही. मग वसतिगृहांसाठी निधी कसा मिळणार, असा सवालही प्रा. गमे यांनी केला आहे.

# लाच प्रकरणातील ८८ कारवाईत एकालाच शिक्षा–१० जणांची निर्दोश सुटका

**गोंदिया:** काम करून देण्याच्या नावावर पैसे घेणाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग दणका देत आहे. मागील पाच वर्षांत अशा प्रकारच्या ८८ कारवाई करण्यात आल्या आहेत. मात्र, आश्चर्याची बाब अशी की, यातील २६ प्रकरणांचा निकाल लागला असून फक्त एकालाच शिक्षा झाली आहे. तर १० जण निर्दोष ठरले आहेत. एखाद्याचे काम करून देण्यासाठी थेट पैशांची मागणी करण्याचे प्रकार सर्रास घडत आहेत. एक प्रकारे ही समाजात आता परंपराच झाली आहे.काम करायचे आहे तर पैसा लागणार हे सर्वांनाच ठाऊक आहे, यासाठी काम असलेली व्यक्तीसुद्धा तेवढी तयारी ठेवतो. मात्र, कित्येकांना पैसे खाऊ घालून काम करवून घेणे वाटत नाही. शिवाय काम करून देण्यासाठी पैशांची मागणी करणे हा गुन्हा असून यावर अंकूश ठेवण्यासाठी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग सज्ज आहे.

यातूनच लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने जिल्ह्यात कित्येक कारवाया केल्या आहेत. सन २०१८ पासून म्हणजेच मागील ५ वर्षांवर नजर टाकल्यास विभागाने जिल्ह्यात लाचखोरीच्या ८८ कारवाया केल्या आहेत. यामध्ये आतापर्यंतयं २६ प्रकरणांत निकाल सुनावण्यात आला आहे. १० जणांना निदोष ठरविण्यात आले. आश्चर्याची बाब म्हणजे फक्त एकालाच शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्यामुळे सुनावनीच्या प्रक्रियेत असलेल्या उर्वरित ४२ प्रकरणाच्या निकालात किती निर्दोष सुटतात व किती लाचखोर ठरतात, यासाठी प्रतिक्षा करावी लागणार आहे.

# दहा वर्ष पूर्ण झालेली आधार कार्ड अद्ययावत करावी-उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे

**गोंदिया :** केंद्र शासनाच्या वतीने देशभर नागरिकांच्या आधार कार्ड नोंदणीची मोहिम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आलेली आहे. आज रोजी बहुतांश नागरिकांचे आधार कार्ड काढण्यात आले आहे. शासनाने जारी केलेल्या नियमावलीनुसार दर दहा वर्षानी आधार कार्ड अपडेट करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ज्या नागरिकांचा आधार नोंदणी करून दहा वर्ष इतका कालावधी पूर्ण झाला आहे. त्यांनी आपले आधार कार्ड अपडेट करुन घ्यावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे (नोडल अधिकारी आधार) यांनी केले आहे.

आधार कार्ड काढल्यानंतर कालांतराने अनेक बदल होतात. जसे पत्ता, बोटांचे ठसे. नावातील चुका, मोबाईल क्रमांक यासह अनेकदा एकापेक्षा अधिक आधार कार्ड नोंदणी झाली असल्याची शक्यता असते. आधारकार्डला सबंधितांची माहिती नोंद असल्याने यासर्व नोंदीचे अद्यावतीकरण होणे आवश्यक असते. त्यासाठी दर दहा वर्षानी आधार ईकेवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे ज्या नागरिकांना आधार कार्ड काढून दहा वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. त्यांनी आपल्या नजीकच्या आधार केंद्रावर जाऊन आधार ईकेवायसी करुन घेणे आवश्यक आहे.

यासाठी शासनाने डेमोग्राफिक अपडेट साठी (नाव, पत्ता, जन्म दिनांक, लिंग, मोबाईल क्र. ई–मेल ) इत्यादी साठी ५० रू तसेच बायोमेट्रीकसाठी अपडेट (हाताचे बोटाचे ठसे. डोळ्यातील रेटीना स्कॅन ) साठी १०० रू इतके शुल्क निर्धारीत केलेले आहे. केंद्र शासानाच्या आधार विनियमन २०१६ मधील नियमांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा आधार नियंत्रण समितीची स्थापणा करण्यात आलेली आहे. शासनाच्या ०९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राजपत्रान्वये १८ वर्षावरील नागरिकांनी आपले आधार कार्ड नसल्यास व १८ वर्षानंतर पहिल्यांदाच आधार नोंदणी करीत असल्यास अश्या नागरिकांची कागदपत्राची यापुढे जिल्हा स्तरीय आधार नियंत्रण समिती मार्फत तपासणी करण्यात येणार आहे.

आतापर्यंत आधार कार्ड का काढल्या गेले नाही याची तपासणी या समितीकडे सादर करण्यात येणार आहे. सदर आधार नियंत्रण समितीकडे सदर नागरिकांचे कागदपत्र तपासले जाईल. आधार नियंत्रण समितीच्या मंजुरी शिवाय आधार कार्ड देणे शासनाने बंद केले आहे. त्यामुळे ज्या नागरिकांनी अद्याप आधार कार्ड काढलेले नाही त्या नागरिकांनी आपल्या आधार कार्ड साठी माहिती तंत्रज्ञान विभाग शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे आपल्या सर्व कागदपत्रासह रितसर अर्ज करावेत. सदर अर्जाची तपासणी करण्यात येईल व आधार नियंत्रण समिती कडे सदर अर्ज प्रस्तुत केल्या जाईल. आधार नियंत्रण समितीची मान्यता मिळाल्यानंतरच नवीन आधार कार्ड काढण्यासाठी मंजुरी देण्यात येईल.

ज्या नागरिकांचे आधार कार्ड काढून दहा वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. त्यांनी आपले आधार कार्ड ईकेवायसी अपडेट करून घ्यावे. आधार अपडेट न केल्यास भविष्यात आधार क्रमांक स्थगित होण्याची शक्यता आहे. असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी, स्मिता बेलपत्रे यांनी केलेले आहे.

# सालेकसाच्या कन्येचा पाक सीमेवर पराक्रम; ड्रोन नॉक आउट करणारी पहिली महिला ठरली

**गोंदिया:** जिल्ह्यातील हलबीटोला (ता. सालेकसा) येथील महिला बीएसएफ जवान भाग्यश्री श्यामलाल नाईक या कन्येने भारत–पाकिस्तान सीमेवर पाकिस्तानकडून आलेल्या ड्रोनला मारुन पाडल्याने नवा किर्तीमान घडवला आहे. प्रथमच एका महिला बीएसएफ जवानाने ड्रोन मारुन पाडण्याचा नवा किर्तिमान घडविला आहे. तिच्या या कार्यामुळे सालेकसा तालुक्यात सर्वत्र तिचे अभिनंदन करण्यात येत आहे. पाकिस्तानकडून सीमेवरून ड्रोनच्या माध्यमातून मादक पदार्थ तसेच शस्त्र पाठविण्याचा क्रम मागील काही वर्षांपासून सुरू आहे. प्रत्येक वेळी भारतीय लष्करातील जवान पाकिस्तानच्या या कारवाईवर सडेतोड उत्तर देताना त्यांच्या





कडून पाठवलेले ड्रोन मारून पाडतात.परंतु, यावेळी ड्रोन पाडणाऱ्यांमध्ये प्रथम दोन महिला बीएसएफ जवानांचा समावेश आहे. त्यामध्ये हलबीटोला–सालेकसा येथील भाग्यश्री श्याम लाल नाईक व तिची सहकारी बीएसएफ जवान प्रीती हिने सीमा ओलांडून येणाऱ्या पाकिस्तान ड्रोनला मारुन खाली पाडले. त्या ड्रोनमध्ये पाकिस्तानकडून पाठविण्यात आलेले २.२० किलो ग्रॅम हेरॉइन जप्त केले गेले.

२५ नोव्हेंबरला सीमेवरून पाकिस्तानने ड्रोनद्वारे आठ पिस्टल पाठविले होते. तेही भारतीय जवानांनी ड्रोनला मारून जप्त केले होते. त्यानंतर लगेच तिसऱ्या दिवशी पाकिस्तान पंजाब प्रांताच्या अमृतसर जवळ रामदास हेक्टरअंतर्गत दरिया मुसा येथील चाहाडपूर गावा जवळ सीमेवरून ड्रोनद्वारे भारतात हेरॉइन मादक पदार्थ पाठवले होते.

त्यावेळी सीमेवर हलबीटोला येथील भाग्यश्री आणि तिची सहकारी प्रीती या दोन बीएसएफ महिला जवान गस्तीवर होत्या. रात्री ११.०० वाजेच्या दरम्यान त्यांना सीमेवरून ड्रोन आल्याचे लक्षात आले,तेव्हा त्यांनी ड्रोनच्या दिशेने सतत २५ फ ेऱ्या फायर केल्या. काही वेळा नंतर ड्रोनच्या हालचाली शांत झाल्याचे कळले,तेव्हा शहानिशा करण्यासाठी गेले असता मारुन पाडलेला ड्रोन एका शेतात पडून होता. त्या ड्रोनमध्ये २.२० किलो ग्रॅम हेरॉइन आढळून आले.

### भाग्यश्रीचा होणार सन्मान

**सालेकसा मुख्यालया पासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या हलबीटोला येथील भाग्यश्री नाईक हिची नियुक्ती सीमा सुरक्षा दलात १ मार्च २०२१ ला झाली होती. त्या नंतर ३१ मार्च २०२२ पर्यत तिचे लष्करी प्रशिक्षण झाले आणि आता ती पंजाब प्रांतात अमृतसरजवळ भारत–पाकिस्तान सीमेवर कर्तव्यावर तैनात आहे. तिच्या पराक्रम ामुळे लष्कराच्या वतीने तिला सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

# कोहमारा-गोरेगाव राज्य महामार्गाच्या रूंदीकरणाची वाट

**सडक–अर्जुनी:** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ लागून असलेल्या कोहमारा–गोरेगाव या मार्गाच्या रुंदीकरणाची मागणी गेल्या अनेक वर्षांपसून रेटून धरली जात आहे. मात्र लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे गेल्या ३ वर्षापासून मार्गाचे काम थंड बस्त्यात पडले आहे.

अर्जुनी–मोरगाव, देवरी, सडक–अर्जुनी तालुक्यातील नागरिकांना कोहमारा–गोंदिया या मार्गाने गोंदिया येथे कामाने ये–जा करावी लागते. या मार्गाने नागरिकांची वर्दळ वाढल्यामुळे अपघाताचे प्रमाणसुद्धा वाढले आहे. गेल्या दोन दिवसांपुर्वी भुसारीटोला गावाजवळ ३ लोकांना आपला जीव गमवावा लागला. अरुंद मार्ग व त्यावर खड्डे पडल्याने वाहन चालवणे फार कठीण झाले आहे. डव्वा गावाजवळ अरुंद पूल असल्यामुळे गेल्या १ वर्षांपुर्वी ४ माणसांना त्या पुलात ट्रॅक्टर पडल्याने जीव गमवावा लागला. अशा एक ना अनेक घटना या मार्गावर घडलेल्या आहेत. त्यासाठी मार्गाचे रूंदीकरण करणे अति गरजेचे झाले आहे. दुचाकी चारचाकी वाहनांना ओव्हरटेक करणे, वाहन चालविणे तारेवरची कसरत ठरत आहे.

कोहमारा–गोंदिया मार्गातील काही ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा मुरुम न भरल्यामुळे गाडी रस्त्याखाली उतरुन अपघात होणे आता नित्याचीच बाब झाली आहे. या मार्गावरील सडक–अर्जुनी, वडेगाव, परसोडी, खजरी, डव्वा, पाटेकुर्रा, मुरदोली आदी गावातील रस्ते फार अरुंद असल्यामुळे प्रवाशांना ये–जा करणे कठिण झाले आहे. याच मार्गावर काही ठिकाणी खड्डे पडल्यामुळे वाहनांना खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात अपघातही झाले आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देून खजरी, पाटेकुर्रा, वडेगाव, परसोडी, भुसारीटोला आदी परिसरात पडलेले खड्डे बुजविण्याची नितांत गरज आहे.

मार्गावर नेहमीच अपघात होऊन काहींना जीवही गमवावा लागला. अशा घटना घडत असल्याने याकडे कुणी लोकप्रतिनिधींनी लक्ष देतील का? असा सवाल परिसरातील नागरिक करीत आहेत. याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.